ऑनलाईन साप्ताहिक वाचण्यासाठी
आमचा क्युआर कोड स्कॅन करा.


साप्ताहिक
# गोदावरी
परिवार

RNI Regd. No.: MAHMAR/1999/7490

पोस्ट रजि.नं.-AR/TECH NO RNP-JAL/120/2019-21

* वर्ष २४ वे * अंक २७ * सोमवार ०३/०७/२०२३ * डाक ०५/०७/२०२३ * पाने - ६ * किंमत २ रुपये

**सोमवार दि. ०३ जुलै : गुरुपौर्णिमा**



# शस्त्रक्रिया अभियानाने हजारो गरजू रूग्णांना उपचाराची दिशा

## डॉ. उल्हास पाटील रूग्णालयाचे अभियान ठरलेय आशेचा किरण

**जळगाव - पैशांअभावी उपचारात टाळाटाळ करणाऱ्या गरजू रूग्णांसाठी डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय धर्मार्थ रूग्णालयाचे शस्त्रक्रिया अभियान एक आशेचा किरण ठरले आहे. या अभियानाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील गरजू रूग्णांना योग्य उपचाराची दिशा मिळाली असून अभियानात आत्तापर्यंत तीन हजाराहून अधिक रूग्णांनी आरोग्याची तपासणी करून घेतली आहे. त्यापैकी ३५० हून अधिक रूग्णांवर विविध प्रकारच्या शस्त्रक्रिया यशस्वीरित्या करण्यात आल्या आहेत.**

डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय धर्मार्थ रूग्णालयातर्फे उत्तर महाराष्ट्रातील सर्वात मोठे मोफत शस्त्रक्रिया अभियान सध्या सुरू आहे. विशेषत: ग्रामीण भागातील गरजू रूग्णांना उपचाराची मोफत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी या अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे. पैसे नाहीत म्हणून उपचाराकडे दुर्लक्ष करणाऱ्यांच्या संख्या मोठ्या प्रमाणावर आहेत. उपचारापासून कुठलाही रूग्ण वंचित राहू नये या उद्देशाने हे मोफत शस्त्रक्रिया अभियान राबविले जात आहे. तसेच ग्रामीण भागात दैनंदिन रूग्णालयाच्या माध्यमातून शिबीरांचे आयोजन करून गरजू रूग्णांना उपचारासाठी रूग्णालयात आणले जाते. आता सुरू असलेले शस्त्रक्रिया अभियान रूग्णांसाठी आशेचा किरण ठरत आहे.



### दोन हजाराहून अधिक रूग्णांची तपासणी

डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय रूग्णालयाच्या मोफत शस्त्रक्रिया अभियानाला रूग्णांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. तब्बल दोन हजाराहून अधिक रूग्णांची तपासणी करण्यात आली असून त्यापैकी ३५० हून अधिक रूग्णांवर विविध प्रकारच्या शस्त्रक्रिया तज्ञ डॉक्टरांमार्फत करण्यात आल्या आहेत. शस्त्रक्रिया अभियानासाठी तज्ञ डॉक्टरांची टीम कार्यरत असून रूग्णांच्या देखभालीसाठी निवासी डॉक्टर आणि प्रशिक्षीत परिचारीका नेमण्यात आल्या आहेत. त्यामुळे प्रकृतीच्यादृष्टीने रूग्णाच्या प्रत्येक हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवले जाते.

### ग्रामीण भागातील रूग्णांना आरोग्य योजनांचा लाभ

डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व धर्मार्थ रूग्णालयात महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना, प्रधानमंत्री आयुषमान भारत योजना, ईएसआयसी यासारख्या आरोग्याच्या योजनांचा लाभ ग्रामीण भागातील रूग्णांना मिळत आहे. या योजनांच्या माध्यमातून लाखो रूपयांच्या शस्त्रक्रिया अगदी मोफत केल्या जात आहेत. या अभियानात कॅन्सर शस्त्रक्रिया, मुत्ररोग शस्त्रक्रिया, अस्थिरोग शस्त्रक्रिया, मेंदूविषयक शस्त्रक्रिया, कान-नाक-घसा शस्त्रक्रिया, बालरोग शस्त्रक्रिया, दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया, स्त्रिरोग शस्त्रक्रिया, मणकेविकार शस्त्रक्रिया केल्या जात आहेत. तसेच हृदयाची एन्जीओप्लास्टीही मोफत केली जात आहे. ग्रामीण भागातून येणाऱ्या प्रत्येक रूग्णांना आरोग्य योजनांचा लाभ देऊन उपचाराची योग्य दिशा मिळाल्याचे समाधान रूग्णांच्या नातेवाईकांकडून व्यक्त होत आहे.

# डॉ. उल्हास पाटील यांच्या हस्ते आरोग्यमंत्रा व्हाट्स ॲप सेवेचा शुभारंभ

**जळगाव** – आषाढी एकादशी व डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयाचे अधीष्ठाता डॉ. एन.एस. आर्विकर यांच्या वाढदिवसानिमित्त माजी खा. डॉ. उल्हास पाटील यांच्याहस्ते आज आरोग्यमंत्रा या व्हाट्स ॲप सेवेचा शुभारंभ करण्यात आला.

या सेवेच्या माध्यमातून दैनंदिन आरोग्याशी निगडीत माहिती सर्वसामान्यांपर्यत पोहोचवून आरोग्यविषयक जनजागृती केली जाणार आहे. तसेच डॉ. उल्हास पाटील रूग्णालयातील आवश्यक सेवांविषयीची माहिती देखिल या सेवेच्या माध्यमातून पोहोचविली जाणार आहे.

आरोग्यमंत्रा या व्हाट्स ॲप सेवेचा लाभ घेण्यासाठी क्युआर कोड स्कॅन करून समूहात सहभागी व्हावे असे आवाहन डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयातर्फे करण्यात आले आहे. या सेवेच्या शुभारंभप्रसंगी वैद्यकीय महाविद्यालयाचे अधीष्ठाता डॉ. एन.एस.आर्विकर, हृदयविकार तज्ञ डॉ. वैभव पाटील,



रजीस्ट्रार प्रमोद भिरूड, कंटेट ओशन प्रा. लि.चे संचालक डॉ.युवराज परदेशी, तुषार भांबरे, रजत भोळे यांच्यासह वैद्यकिय महाविद्यालयाचे तालुका समन्वयक उपस्थित होते.


# हृदयविकार तज्ञांनी जोखीम पत्करुन अनुभवाच्या आधारे एन्जीओप्लास्टी व पेसमेकर शस्त्रक्रिया केली यशस्वी

### महात्मा ज्योतिबा फुले योजनेंतर्गत मोफत उपचार

**जळगाव** – एक ते दोन तास नव्हे तर तब्बल १२ तास घरीच राहून छातीचे दुखणे अंगावर सहन केलेल्या ६० वर्षीय रुग्णाला अखेरीस तीव्र हृदयविकाराचा झटका आल्याने त्याची प्रकुती अत्यावस्थ झाली. अशा अवस्थेत रुग्णालयात दाखल झाल्यानंतर हृदयविकार तज्ञांनी तात्काळ कॅथलॅबमध्ये घेऊन जोखीम स्विकारत आपल्या अनुभवाच्या आधारे प्रायमरी एन्जीओप्लास्टी आणि हृदयाचे ठोक्यांवर नियंत्रण मिळविण्यासाठी पेसमेकर शस्त्रक्रिया यशस्वीरित्या केली. हृदयालयातील तत्पर सेवेमुळे मी आज जिवंत आहे, असे म्हणत रुग्णाने आभार मानले.

भुसावळ येथील उमेश नामक ६० वर्षीय रुग्णाने हृदयविकाराच्या झटक्याला हलक्यात घेतले मात्र तेच दुखणे त्याच्या जीवावर बेतले. अतिगंभीर अवस्थेत रुग्णाला डॉ.उल्हास पाटील रुग्णालयातील हृदयालयात दाखल करण्यात आले. यावेळी रुग्णाच्या हृदयाचे ठोकेही जलदगतीने वाढले. त्यामुळे खुप मोठे आव्हान डॉक्टरांसमोर उभे राहिले. येथे डीएम कार्डिओलॉजिस्ट डॉ.वैभव पाटील व डॉ.सुमित शेजोळ यांनी आव्हान स्विकारत रुग्णावर तातडीने उपचार सुरु केले. एन्जीओप्लास्टी सुरु असतांनाच अचानक हृदयाचे ठोकेही वाढले. त्यावेळी शॉक ट्रिटमेंटही देण्यात आली. हृदयविकार तज्ञांनी आपले कौशल्य पणाला लावून केवळ अर्धा तासात जलदगतीने शास्त्रशुद्धरित्या शस्त्रक्रिया यशस्वी केली. त्या रुग्णाने हृदयालयातील डॉक्टरांद्वारे झालेले उपचार तसेच अतिदक्षता विभागात डॉक्टर्स तसेच नर्सिंग स्टाफने केलेली सेवा याबद्दल आभार मानले.

हृदयालयातील उपचारांसाठी येथे शासनाच्या सर्व योजना लागू असून सदर रुग्णावर महात्मा ज्योतिबा फुले योजनेंतर्गत उपचार करण्यात आले. अतिगंभीर अवस्थेत आलेला रुग्ण स्वत:च्या पायावर चालत आनंदाने घरी परतला.




### छातीचे दुखणे हलक्यात घेऊ नका; हृदयविकार तज्ञांचा सल्ला

*हृदयविकाराचा झटका येण्यापूर्वी शरिर माणसाला संकेत देत असते. यात काही रुग्णांना थंड घाम येणे, शरीर गार पडणे, उलटी होणे, छातीत तीव्र वेदना, पाठीत वरच्या भागात चमका येणे, खांदा दुखणे अशी लक्षणे साधारणत दिसतात. यापैकी कुठलेली लक्षण दिसून आल्यास त्याकडे दुर्लक्ष करु नका, लगेचच डॉक्टरांना भेटा. हृदयविकाराचा रुग्ण जितक्या लवकर इस्पीतळात येईल तितके उपचार जलगद आणि रुग्णाची रिकव्हरी जास्त मिळते, त्यामुळे छातीचे कुठलेही दुखणे हलक्यात घेऊ नका. असा सल्ला हृदयालयातील डीएम कार्डिओलॉजिस्ट* ***डॉ.वैभव पाटील व डॉ.सुमित शेजोळ*** *यांनी दिला.*

# मणक्याच्या शस्त्रक्रियेमुळे रुग्ण चालू लागला पायावर

**जळगाव – मागील चार वर्षापासून मणका विकार असून पायावर चालणे अवघड झालेल्या ६० वर्षीय रुग्णाला डॉ उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय आणि धर्मार्थ रूग्णालयात करण्यात आलेल्या मणका शस्त्रक्रियेने आराम पडला असून आज रुग्ण स्वत:च्या पायावर चालत आहे.**

**(पान ६ वर)**

### शस्त्रक्रियेद्वारे दिनचर्या सुरळीत

**डॉ.प्रमोद सारकेलवाड (स्पाईन व जॉईंट रिप्लेसमेंट तज्ञ)**

**मणका विकारात सर्वप्रथम औषधी-गोळ्या देवून उपचार केले जातात. परंतु औषधींचा परिणाम होत नसल्यास आणि दुखणे दीर्घकाळापासून (जुनाट) असेल, अशावेळी मणका शस्त्रक्रियेचा सल्ला दिला जातो. अशा शेकडो रुग्णांवर येथे मणका शस्त्रक्रिया करण्यात आली असून शस्त्रक्रियेनंतर रुग्णाची दिनचर्या सुरळीत झाल्याचे स्पाईन व जॉईंट रिप्लेसमेंट तज्ञ डॉ.प्रमोद सारकेलवाड यांनी सांगितले.**





### मी खूप आनंदी आहे

*बऱ्याच वर्षापासून मी २० ते २५ मीटर देखील चालू शकत नव्हतो. अनेक खाजगी रुग्णालयात गेलो मात्र काही उपयोग झाला नाही. शस्त्रक्रियेसाठी लाखो रुपयांचा खर्च सांगण्यात आला होता. तरी पुन्हा चालता येईल ही शाश्वती दिली जात नव्हती मात्र येथे डॉक्टरांनी हमी घेतली आणि आज मी खरोखर माझ्या पायावर चालू शकत आहे. योजनेत माझ्यावर उपचार झाले. डॉ उल्हास पाटील रूग्णालयात शस्त्रक्रिया यशस्वी झाल्याचे समाधान आहे.*

***– शब्बीर मोहंमद बागवान.***

# शस्त्रक्रिया अभियानांतून आरोग्याची नांदी

## अभियानाला ग्रामीण भागातून उदंड प्रतिसाद

**जळगाव – गोदावरी फाऊंडेशन संचलित डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व धर्मार्थ रूग्णालयाच्या माध्यमातून ग्रामीण भागात सुरू असलेल्या शस्त्रक्रिया अभियानातून आरोग्याची नांदी ठरत आहे. दरम्यान ग्रामीण भागातून या शस्त्रक्रिया अभियानाला उदंड प्रतिसाद मिळत आहे.**



### देवरी ता. अकोटमध्ये ८५ जणांची तपासणी

**अकोट –** तालुक्यातील देवरी येथे आयोजित महाआरोग्य शिबिरात ८५ जणांची तपासणी करण्यात आली. यातील २४ नागरिकांना पुढील उपचाराचा सल्ला देण्यात आला.

शिबिरात मेडीसिन तज्ञ डॉ सचिन,सर्जरी डॉ. आशिष, नेत्ररोग डॉ प्रियंका. आणि अस्थीरोग तज्ञ डॉ.शुभम यांनी तपासणी केली.या शिबिराचे आयोजन सरपंच वर्षाताई संतोष गायकवाड,उपसरपंच सुनिता विठठल तायडे यांच्या उपस्थितीत करण्यात आले. शिबिरासाठी ग्रामपंचायत सदस्यांनी सहकार्य केले.




### शेलूद ता.भोकरदनात ३५ जणांची तपासणी

**खामगाव –** तालुक्यातील घाणेगाव येथे आयोजित महाआरोग्य शिबिरात ३५ जणांची तपासणी करण्यात आली. यातील १० नागरिकांना पुढील उपचाराचा सल्ला देण्यात आला.

शिबिरात मेडीसिन तज्ञ डॉ विनय,सर्जरी डॉ. श्वेता, नेत्ररोग डॉ यश.कान नाक घसा तज्ञ डॉ.बासू आणि अस्थीरोग तज्ञ डॉ.अंकीत तर टु डी इको डॉ जोस यांनी तपासणी केली.या शिबिराचे आयोजन सरपंच,उपसरपंच यांच्या उपस्थितीत करण्यात आले. शिबिरासाठी ग्रामपंचायत सदस्यांनी सहकार्य केले.

### देवगाव देवळी ता. अमळनेरात ५५ जणांची तपासणी

**अकोट –** तालुक्यातील देवरी येथे आयोजित महाआरोग्य शिबिरात ५५ जणांची तपासणी करण्यात आली. यातील १६ नागरिकांना पुढील उपचाराचा सल्ला देण्यात आला.

शिबिरात मेडीसिन तज्ञ डॉ विनय,सर्जरी डॉ. श्वेता, नेत्ररोग डॉ यश.कान नाक घसा तज्ञ डॉ.बासू आणि अस्थीरोग तज्ञ डॉ.अंकीत तर टु डी इको डॉ जोस यांनी तपासणी केली.या शिबिराचे आयोजन सरपंच कल्पनाबाई चंद्रभान माळी,उपसरपंच संदिप जगन्नाथ शिंदे,पो. पा अविनाश अशोक बैसाणे,छोटू वना मोरे यांच्या उपस्थितीत करण्यात आले. शिबिरासाठी ग्रामपंचायत सदस्यांनी सहकार्य केले.



### घाणेगाव ता. खामगावात ५५ जणांची तपासणी

**खामगाव –** तालुक्यातील घाणेगाव येथे आयोजित महाआरोग्य शिबिरात ९८ जणांची तपासणी करण्यात आली. यातील ३० नागरिकांना पुढील उपचाराचा सल्ला देण्यात आला.

शिबिरात मेडीसिन तज्ञ डॉ विनय,सर्जरी डॉ. श्वेता, नेत्ररोग डॉ यश.कान नाक घसा तज्ञ डॉ.बासू आणि अस्थीरोग तज्ञ डॉ.अंकीत तर टु डी इको डॉ जोस यांनी तपासणी केली.या शिबिराचे आयोजन सरपंच आत्माराम महादेव बागडे,उपसरपंच दशरथ किसन वानखेडे यांच्या उपस्थितीत करण्यात आले. शिबिरासाठी ग्रामपंचायत सदस्यांनी सहकार्य केले.





### बुलढाण्यात हृदय विकाराबाबत मार्गदर्शन अन् सल्ला

**बुलढाणा –** येथे सामान्य रूग्णालयाच्या सयुक्त विदयमाने हदयरोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.

शिबिरात मेडीसिन व हदयरोग तज्ञ तसेच टु.डी इको तंत्रज्ञ डॉ जोस यांनी तपासणी केली. यावेळी ७५ नागरिकांची तपासणी करण्यात येवून १५ रूग्णांना पुढील उपचाराबाबत सल्ला देण्यात आला. तसेच हदयविकारा पासून बचावासाठी मार्गदर्शन करण्यात आले.



### डोमरुल शिबिरात ८९ नागरिकांची तपासणी

**बुलढाणा –** जिल्हयातील डोमरूल येथे आयोजित महाआरोग्य शिबिरात ८९ जणांची तपासणी करण्यात आली. यातील २९ नागरिकांना पुढील उपचाराचा सल्ला देण्यात आला.

शिबिरात मेडीसिन तज्ञ डॉ सचिन,सर्जरी डॉ. श्वेता, नेत्ररोग डॉ शांती यांनी तपासणी केली.या शिबिराचे आयोजन सरपंच,उपसरपंच यांच्या उपस्थितीत करण्यात आले. शिबिरासाठी ग्रामपंचायत सदस्यांनी सहकार्य केले.

# पारध, वसंतनगर, जुनोने, निंभोरे तांड्यात आरोग्य तपासणी

### पारध, ता.भोकरदन

भोकरदन तालुक्यातील पारध येथे आयोजित महाआरोग्य शिबिरात ८२ जणांची तपासणी करण्यात आली. यातील २४ नागरिकांना पुढील उपचाराचा सल्ला देण्यात आला.शिबिरात मेडीसिन तज्ञ डॉ अभिषेक,सर्जरी डॉ. आशिष, नेत्ररोग डॉ यश.आणि अस्थीरोग तज्ञ डॉ.अंकीत यांनी तपासणी केली. शिवसेना उबाढाचे जालना उप जिल्हा प्रमुख मनिषभैया श्रीवास्तव हे प्रमुख उपस्थीती होती. या शिबिराचे आयोजन सरपंच,उपसरपंच यांच्या उपस्थितीत करण्यात आले. शिबिरासाठी ग्रामपंचायत सदस्यांनी सहकार्य केल.

### वसंतनगर ता. जामनेरमध्ये ४३ जणांची तपासणी

जामनेर तालुक्यातील वसंतनगर येथे आयोजित महाआरोग्य शिबिरात ४३ जणांची तपासणी करण्यात आली. यातील २४ नागरिकांना पुढील उपचाराचा सल्ला देण्यात आला.शिबिरात मेडीसिन तज्ञ डॉ सचिन,सर्जरी डॉ. अंकीत, नेत्ररोग डॉ शांती. आणि अस्थीरोग तज्ञ डॉ.संदीप यांनी तपासणी केली.या शिबिराचे आयोजन वसंतनगर मित्र परिवार व आम आदमी पार्टी ता अध्यक्ष दिपकभाउ राठोड यांच्या वाढदिवसानिमीत्त करण्यात आले. शिबिरासाठी मित्रपरिवाराचे सहकार्य केले.





### जूनोने गावमध्ये ४४ जणांची तपासणी

जामनेर तालुक्यातील जूनोने गाव येथे आयोजित महाआरोग्य शिबिरात ४४ जणांची तपासणी करण्यात आली. यातील २४ नागरिकांना पुढील उपचाराचा सल्ला देण्यात आला.शिबिरात मेडीसिन तज्ञ डॉ अभिषेक, नेत्ररोग डॉ प्रियंका. आणि अस्थीरोग तज्ञ डॉ.अवनी यांनी तपासणी केली.या शिबिराचे आयोजन जनोने गाव व आम आदमी पार्टी ता अध्यक्ष दिपकभाउ राठोड यांच्या वाढदिवसानिमीत्त करण्यात आले. शिबिरासाठी मित्रपरिवाराचे सहकार्य केले.

### निंभोरे तांडयात ८९ जणांची तपासणी

पाचोरा तालुक्यातील निंभोरा तांडा येथे आयोजित महाआरोग्य शिबिरात ८९ जणांची तपासणी करण्यात आली. यातील २४ नागरिकांना पुढील उपचाराचा सल्ला देण्यात आला.शिबिरात मेडीसिन तज्ञ डॉ अब्दुल्ला,सर्जरी डॉ. जयश्री, नेत्ररोग डॉ दर्शन,कान नाक घसा डॉ बासू,स्त्रीरोग डॉ. कनिष्का आणि अस्थीरोग तज्ञ डॉ. शुभम यांनी तपासणी केली.या शिबिराचे आयोजन सचिनदादा सोमवंशी युवा फॉउंडेशन व निंभोरा कांग्रेस कमीटी आणि जय सेवालाल मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आले. शिबिरासाठी वरील सर्व संस्था पदाधिकारी व कार्यकर्ते यांचे सहकार्य लाभले.



संपादक : सुभाष पाटील (रजि. न्युजपेपर) साप्ताहिक गोदावरी परिवार : मालक, प्रकाशक, मुद्रक : डॉ. सौ. वर्षा पाटील यांनी अक्षरमुद्रा प्रिंटर्स, प्लॉट नं.६, कलेक्टर बंगल्याच्या बाजूला, साने गुरूजी कॉलनी, जळगांव येथे छापून गोदावरी हॉस्पीटल, भास्कर मार्केट जवळ, जळगांव येथे प्रसिद्ध केले. फोन नं. २२२१८३४/३५, अंकात बातम्या प्रसिध्द करण्यासाठी या ईमेलवर पाठवाव्यात Email : godavari.parivar@gmail.com(अंकात प्रकाशित झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

# ब्रेन, बॉडी आणि माईंड हे सध्याच्या युगातील प्रॉडक्ट : प्रमोद अत्तरदे

**जळगाव –** उद्योग करायचा असेल तर त्यात आपला इंटरेस्ट असणे खूप महत्त्वाचा असते. इतरांची कॉपी करून तो होत नसतो. याचे उत्कृष्ट उदाहरण देऊन त्यांनी सांगितले. एक चांगला लीडर तो असतो जो त्याचा वारसा एकाकडून दुसऱ्याला देतो. पॉलिटिकल, सोशल, बिझनेस यांच्या माध्यमातून वारसदार तयार करणे गरजेचे असते. तसेच त्यांनी अमेरिकेतील निवड प्रणाली व भारतात सध्या परिस्थितीत असलेली प्रणाली यामधील फरक समजावून सांगितला .ब्रेन, बॉडी आणि माईंड हे सध्याच्या युगातील प्रॉडक्ट आहे त्यांना नेहमी कार्यरत ठेवणे गरजेचे आहे. असे प्रतिपादन अमेरीकेचे उद्योजक प्रमोद अत्तरदे यांनी आज जळगावात केले.

गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालयात त्यांचा सत्कार करण्यात आला यावेळी ते बोलत होते. अत्तरदे यांची न्यू जर्सी येथील एडिसन शहरात कॉर्पोरेशन मध्ये कॉर्पोरेटर म्हणून भरघोस मतांनी निवड झालेली आहे.

अमेरिकेतील रोजगार संधी व नवीन तंत्रज्ञान यावर मार्गदर्शन गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आ. निळकंठ फालक होते तसेच विशेष अतिथी म्हणून गोदावरी फाउंडेशनचे अध्यक्ष माजी खा. डॉ. उल्हास पाटील हे उपस्थित होते. व्यासपीठावर पुरुषोत्तम पिंपळे, कृष्णाजी खडसे, ंडू दादा काळे, सौ. नीता वराडे डॉ. ज्योती महाजन, सौ. निला चौधरी,ॲड. प्रवीणचंद्र जंगले, अनुवा अत्तरदे तसेच सकल लेवा पाटीदार मंडळे यांच्या माध्यमातून मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला व त्यानंतर दीप प्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर आलेल्या सर्व मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. अरुण बोरोले यांनी प्रास्ताविकात संपूर्ण कार्यक्रमाची रूपरेषा आयोजनाद्दल माहिती दिली. प्रमोद



अत्तरदे यांची न्यू जर्सी येथील एडिसन शहरात कॉर्पोरेशन मध्ये कॉर्पोरेटर म्हणून निवड झाली या निमित्ताने हा स्वागत समारंभ आयोजित करण्यात आला. या सत्कार सोहळ्याचे आयोजन सकल लेवा पाटीदार मंडळे, जळगाव शहर यांच्या माध्यमातून करण्यात आले.सत्कारमूर्ती प्रमोद अत्तरदे यांचा सत्कार गोदावरी फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ.उल्हास पाटील यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन करण्यात आला. अत्तरदे यांनी त्यांच्या मार्गदर्शनात अमेरिकेमध्ये उद्योग धंद्यांना असलेले अनुकूल वातावरण तसेच बदलत्या काळानुसार तेथील रोजगार संधी, तिथे येणारे तंत्रज्ञान, जागतिक बाजारपेठ, भारतातील सद्यस्थिती आणि त्याचे सामाजिक पडसाद या विषयांवर ते मार्गदर्शन केले.अमेरिकेत चालवित असलेल्या अत्तरदे फाउंडेशनच्या माध्यमातून राबवत असलेले उपक्रम यावरही त्यांनी प्रकाश टाकला.त्यानंतर त्यांनी उपस्थितांच्या प्रश्नांची समर्पक उत्तरे दिली.

डॉ. उल्हास पाटील यांनी मार्गदर्शन करताना खानदेशातील विद्यार्थ्यांना परदेशात संधी कशा पद्धतीने मिळवून देता येतील, यासाठी प्रमोद अत्तरदे हे आपल्यासाठी एक प्रभावी माध्यम आहे. व त्यांच्या संगनमताने एक कोऑर्डिनेशन सेंटर जे विद्यार्थ्यांना परदेशात यशस्वी होण्यासाठी मदत करेल असे मार्गदर्शन केंद्र स्थापन करावे. या कार्यासाठी गोदावरी फाउंडेशन नेहमी अग्रेसर असेल असे नमूद केले. त्यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री निळकंठ फालक यांनी अत्तरदे यांचे कौतुक करताना सांगितले की एक भारतातील व्यक्ती परदेशातील राजकारणात यशस्वी होतो त्याबद्दल संपूर्ण समाजाला अभिमान आणि गर्व आहे.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मिलिंद पाटील व आभार प्रदर्शन प्रा. हेमंत इंगळे यांनी केले.

# आसलगाव, ता. खामगावात ३० जणांची तपासणी



खामगाव तालुक्यातील घाणेगाव येथे आयोजित महाआरोग्य शिबिरात ३० जणांची तपासणी करण्यात आली.

यातील ०६ नागरिकांना पुढील उपचाराचा सल्ला देण्यात आला.शिबिरात मेडीसिन तज्ञ डॉ विनय,सर्जरी डॉ. श्वेता, नेत्ररोग डॉ यश.कान नाक घसा तज्ञ डॉ.बासू आणि अस्थीरोग तज्ञ डॉ.अंकीत तर टु डी इको डॉ जोस यांनी तपासणी केली.या शिबिराचे आयोजनसरपंच, उपसरपंच यांच्या उपस्थितीत करण्यात आले. शिबिरासाठी ग्रामपंचायत सदस्यांनी सहकार्य केले.

# गोदावरी फाऊंडेशनमध्ये विठू नामाचा गजर...!

## डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व धर्मदाय रुग्णालय

**जळगाव –** डॉ. उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालय परिसरातील निवासी तज्ञ डॉक्टर आणि प्रशासन अधिका–यांनी आणि विद्यार्थ्यांनी आगळया वेगळया पध्दतीने आषाढी एकादशी आनंदात साजरी केली. आषाढी एकादशी निमित्ताने ईशांन्वी आशिष भिरूड व लिपाक्ष पाराजी बाचेवार या चिमुकल्यांनी विठ्ठल व रूक्मीणीची वेशभूषेत परिसरातील दिंडीत सहभाग नोंदवला. टाळांच्या गजरात वातावरण भक्तीमय बनवले. यावेळी सर्व निवासी वैद्यकिय तज्ञ, अधिकारी आणि इतर मान्यवर वारकरी मंडळी अशा पोषाखात उपस्थीत होते.उपस्थीत होते.चिमुकले विठ्ठल व रूक्मीणी ईशांन्वी आशिष भिरूड व लिपाक्ष पाराजी बाचेवार यांचे पूजन करण्यात आले. परिसरातील बालगोपालांनी देखिल यावेळी आनंद लुटत सहभागी झाले. हरी नामाच्या गजरात, पांडुरंगाच्या नामाच्या गजरात दिंडीची वारी निघाली .विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल म्हणत ही वारी वैद्यकिय महाविद्यालयाच्या प्रांगणामध्ये नाचत होती . पाऊली खेळत होती. अशा प्रकारे हा दिंडी सोहळा डॉ. उल्हास पाटील महाविद्यालयाच्या दारी अतिशय आनंदमय वातावरणात साजरा करण्यात आला.






## गोदावरी सीबीएसई स्कुल जळगाव

**जळगाव –** येथील गोदावरी सीबीएसई स्कुल जळगाव विठू नामाचा गजर करीत आषाढी एकादशी साजरी करण्यात आली. जळगाव येथे गोदावरी स्कुल परिसरात टाळ,मृंदंगाच्या गजरात दिंडी काढण्यात आली या दिंडीत चिमुकल्यांनी वारकऱ्यांच्या वेशभूषेत , टाळांच्या गजरात वातावरण भक्तीमय बनवले. विठ्ठल मंदिरात देवाची आरती करण्यात आली ,तसेच मुलांकडून समाजप्रबोधनपर नाटिका सादर करण्यात आली.यानंतर स्कुलच्या प्रिन्सीपल निलीमा चौधरी यांचे हस्ते पूजन करण्यात आले.

## डॉ.उल्हास पाटील इंग्लिश मीडियम स्कूल सावदा

**सावदा –** डॉ. उल्हास पाटील इंग्लिश मीडियम सी बी एस ई. . स्कूल सावदा येथे शिशु वर्गातील विद्यार्थ्यांना पंढरपुर येथे आषाढी एकादशी निमित् जाणार्या वारकरी मंडळी अशा पोषाखात बोलावण्यात आले होते. व विठ्ठल रुक्मिणीच्या पूजनाचे आयोजन करण्यात आले होते.

त्यानंतर शाळेच्या प्राचार्या सौ. भारती महाजन यांनी विठ्ठल रुक्मिणीच्या प्रतिमेचे पूजन केले. आणि शाळेतील काही शिक्षकांऩी देखील विठ्ठल रुक्मिणीच्या प्रतिमेचे पूजन करून हरी नामाच्या गजरात, पांडुरंगाच्या नामाच्या गजरात दिंडीची वारी निघाली . शिशु वर्गातील विद्यार्थ्यांनी घवघवीत प्रतिसाद दिला . विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल म्हणत ही वारी शाळेच्या प्रांगणामध्ये नाचत होती . पाऊली खेळत



होती. अशा प्रकारे हा दिंडी सोहळा डॉ. उल्हास पाटील स्कूलच्या दारी अतिशय आनंदमय वातावरणात साजरा करण्यात आला. त्यासाठी सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांचे अनमोल सहकार्य लाभले.

## डॉ. उल्हास पाटील इंग्लिश मीडियम स्कूल भुसावळ



**भुसावळ –** डॉ. उल्हास पाटील इंग्लिश मीडियम स्कूल भुसावळच्या विद्यार्थ्यांनी आनंदात साजरी केली आषाढी एकादशी. आषाढी एकादशी निमित्ताने विद्यार्थ्यांनी भुसावळ शहरात अष्टभुजा मंदिरापासून विठ्ठल मंदिरापर्यंत दिंडी यात्रा काढली. या दिंडीत चिमुकल्यांनी वारकऱ्यांच्या वेशभूषेत, टाळांच्या गजरात वातावरण भक्तीमय बनवले. विठ्ठल मंदिरात देवाची आरती करण्यात आली ,तसेच मुलांकडून समाजप्रबोधनपर नाटिका सादर करण्यात आली. या कार्यक्रमाला भुसावळकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला .या कार्यक्रमाला शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. अनघा पाटील तसेच शाळेतील शिक्षक गण उपस्थित होते .अत्यंत शिस्तपूर्ण वातावरणात कार्यक्रम पार पडला.

## संपादकीय...

# गोष्ट दोन हजाराच्या नोटांची

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सहा वर्षांपूर्वी एका सायंकाळी अचानक नोटाबंदीचा निर्णय जाहीर केला होता. त्याची आठवण ताजी व्हायचे कारण म्हणजे भारतीय रिझर्व्ह बँकेने या नोटाबंदीनंतर चलनात आणलेल्या दोन हजारांच्या नोटा बदलून घेण्याबाबत केलेली घोषणा. खरे तर नोटाबंदीच्या निर्णयानंतर चलनात आलेली ही दोन हजाराची गोड-गुलाबी नोट नंतरच्या तीन-चार वर्षांतच थेट व्यवहारातून दिसेनाशीही झाली! मात्र, नोटाबंदी करणाऱ्या सरकारने दोन हजाराची नोट व्यवहारात आणून नेमके काय साधले, ते लोकांना तेव्हा जसे कळले नव्हते; त्याचप्रमाणे आता हे चलन व्यवहारातून काढून घेतल्यावर काय साध्य होणार तेही सामान्यांच्या आकलनापलीकडले आहे. मोदी यांनी २०१६ मध्ये नोटाबंदीचा निर्णय जाहीर केल्यानंतरच्या अवघ्या काही तासांत बंदी आणलेल्या नोटांचे रूपांतर कागदाच्या साध्या तुकड्यांत झाले होते. त्यानंतर व्यवहारातून काढलेल्या नोटा बदलून घेण्यासाठी वा बँकांमध्ये भरण्यासाठी लोकांचे प्रचंड हाल झाले. अनेकांना खिशात पैसे असूनही आर्थिक कोंडी सोसावी लागली. बँकांमधील भाऊगर्दी आणि एकंदरितच आर्थिक व्यवहारांवर पडलेला या निर्णयाचा ताण कायम लक्षात राहणारा आहे. यावेळी घराघरांतील या नोटा बदलून घेण्यासाठी नियमावली जाहीर झाली आहे. त्यानंतरही दररोज वेगवेगळी स्पष्टता दिली जात असल्यामुळे सामान्य माणसाचा कमालीचा गोंधळ उडाला आहे. खरे तर दोन हजाराची ही नोट चलन व्यवहारातून रद्दच झालेली नाही. या नोटा बदलून घेण्यासाठी वा बँकांमध्ये जमा करण्यासाठी ३० सप्टेंबरपर्यंत मुदत दिलेली आहे. त्यानंतरही ही नोट वैधच (लीगल टेंडर) असणार आहे. रिझर्व बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनीच याबाबत स्पष्टता दिली आहे. गेल्या आठवड्यात हा निर्णय जाहीर करताना रिझर्व बँकेने काढलेल्या परिपत्रकातही हा उल्लेख होताच. तरीदेखील घरातील नोटा येनकेन प्रकारे चलनात आणण्यासाठी दुकाने, पेट्रोलपंप, मॉलपासून ते सराफी दुकानांमध्ये प्रयत्न होत आहेत, त्यावरून हुज्जतही घातली जात आहे. नोटाबंदीच्या आधीच्या अनुभवामुळे सामान्यांमध्ये घबराट आणि धाकधूक उडणे स्वाभाविक आहे. अचानक कोणताही निर्णय होईल या धास्तीपोटीच वारंवार धोरणातील स्पष्टता जाहीर करूनही नागरिकांच्या बँकांसमोर रांगा लागत आहेत, झुंबड उडत आहे. गतअनुभवातून धडा घेत रिझर्व्ह बँकेने त्यामुळेच जनतेची गैरसोय टाळण्यासाठी काही उपाययोजना बँकांना सुचवल्या आहेत, हे रास्त म्हणावे लागेल. खरे तर सहा वर्षांपूर्वी नोटाबंदीचा निर्णय जाहीर करताना, समाजातील काळा पैसा बाहेर यावा, असा हेतू असल्याचे सांगितले गेले होते. प्रत्यक्षात ते उद्दिष्ट कितपत साध्य झाले, ते अयोध्येतील रामच जाणे! दोन हजारांच्या बहुतांश, म्हणजे ८९ टक्के नोटा मार्च २०१७ पूर्वी चलनात आणल्या गेल्या. त्यांचे आयुष्य चार-पाच वर्षे असते. मार्च २०१८ मध्ये ६.७३ लाख कोटी रुपयांच्या दोन हजारांच्या नोटा व्यवहारात होत्या. त्यानंतर त्यांचा वापर घटत गेला. २०२०मध्ये दोन हजारांच्या २७४ कोटी नोटा (एकूण चलनाच्या २.४टक्के) होत्या, त्यांची संख्या आजमितीला एकूण चलनाच्या १.६ टक्के आहे. म्हणजेच त्या बाजारातून काढून घेतल्याने गोंधळाची स्थिती निर्माण होईल, असे म्हणता येत नाही. मात्र, आता या नोटा बदलून घेण्यासाठी वा बँकांमधील आपापल्या खात्यांत जमा करण्यासाठी जाहीर झालेली नियमावली व त्यासंबंधात रोजच्या रोज केले जाणारे खुलासे गोंधळात भरच घालत आहेत. एका वेळी फक्त २० हजार रुपये एवढ्याच मूल्याच्या या नोटा बदलून मिळणार आहेत.

# अस्थिरोग

ऑर्थोपेडिक्स ही एक वैद्यकीय खासियत आहे जी मस्कुलोस्केलेटल डिसऑर्डर आणि जखमांना प्रतिबंध, निदान आणि उपचार यावर केंद्रित आहे. मस्क्यूकोस्केलेटल प्रणालीमध्ये हाडे, सांधे, स्नायू, कंडर आणि अस्थिबंधन समाविष्ट असतात. ऑर्थोपेडिक तज्ञांना मस्क्यूकोस्केलेटल प्रणालीवर परिणाम करणार्या विविध परिस्थितींचे मूल्यांकन, निदान आणि उपचार करण्यासाठी प्रशिक्षित केले जाते, किरकोळ मोच आणि ताणांपासून ते जटिल सांधे बदलणे आणि मणक्याच्या शस्त्रक्रियांपर्यंत. ऑर्थोपेडिक विशेषज्ञ मस्क्यूकोस्केलेटल स्थिती व्यवस्थापित करण्यासाठी विविध गैर-सर्जिकल आणि सर्जिकल हस्तक्षेप वापरतात. गैर-सर्जिकल उपचारांमध्ये शारीरिक उपचार, औषधे किंवा इंजेक्शन्सचा समावेश असू शकतो. सर्जिकल प्रक्रियेमध्ये सांधे पुनर्बांधणी, मणक्याची शस्त्रक्रिया किंवा आर्थ्रो स्कोपिक प्रक्रियांचा समावेश असू शकतो.

ऑर्थोपेडिक डॉक्टर इतर आरोग्यसेवा व्यावसायिकांशी, जसे की फिजिकल थेरपिस्ट, ऑक्युपेशनल थेरपिस्ट आणि वेदना व्यवस्थापन विशेषज्ञ, संपूर्ण रुग्णाची काळजी देण्यासाठी वारंवार सहकार्य करतात. अलिकडच्या वर्षांत शस्त्रक्रिया तंत्र, रोपण आणि पुनर्वसन प्रोटोकॉलमधील प्रगतीसह ऑर्थोपेडिक्सचे क्षेत्र वेगाने विकसित झाले आहे. मस्कुलोस्केलेटल डिसऑर्डर आणि जखमांच्या वाढत्या व्याप्तीसह, ऑर्थोपेडिक तज्ञ त्यांच्या रूग्णांचे संपूर्ण आरोग्य आणि कल्याण राखण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. तुम्ही ज्येष्ठ नागरिक, क्रीडापटू किंवा दीर्घकालीन मस्कुलोस्केलेटल स्थिती असलेले कोणीतरी असो, ऑर्थोपेडिक तज्ञ तुम्हाला तुमची स्थिती व्यवस्थापित करण्यासाठी आणि तुमच्या जीवनाची गुणवत्ता सुधारण्यासाठी आवश्यक असलेले कौशल्य आणि काळजी देऊ शकतात.

### ऑर्थोपेडिक्सचे प्रकार

ऑर्थोपेडिक्सच्या क्षेत्रात विविध प्रकार आहेत, प्रत्येकाकडे त्याचे लक्ष केंद्रित आहे. ऑर्थोपेडिक्सच्या विविध प्रकारांमध्ये हे समाविष्ट आहे:

**जॉइंट रिप्लेसमेंट ऑर्थोपेडिक्स:**

या विशेषतेमध्ये सांधेदुखीसारख्या आजार असलेल्या रुग्णांचे निदान आणि उपचार यांचा समावेश होतो. या क्षेत्रातील ऑर्थो पेडिक सर्जन अनेकदा गतिशीलता सुधारण्यासाठी आणि वेदना कमी करण्यासाठी सांधे बदलण्याची शस्त्रक्रिया करतात.

**स्पोर्ट्स मेडिसिन ऑर्थोपेडिक्स:**

ही खासियत खेळ आणि शारीरिक हालचालींशी संबंधित दुखापतींना प्रतिबंध, निदान आणि उपचार करण्यावर लक्ष केंद्रित करते. स्पोर्ट्स मेडिसिन ऑर्थोपेडिक सर्जन ॲथलीट्ससोबत काम करतात ज्यामुळे त्यांना दुखापतीतून बरे होण्यासाठी आणि शक्ती आणि गतिशीलता परत मिळवण्यात मदत होते.



**बालरोग अस्थिरोग:**

या वैशिष्ट्यामध्ये स्कोलियोसिस किंवा क्लबफूट सारख्या मस्क्यूकोस्केलेटल विकार असलेल्या मुलांवर उपचार करणे समाविष्ट आहे. बालरोग ऑर्थोपेडिक शल्यचिकित्सकांना मुलांवर उपचार करण्यासाठी विशेष प्रशिक्षण असते आणि ते शस्त्रक्रिया आवश्यक असलेल्या जटिल परिस्थितींचे व्यवस्थापन करण्यास सुसज्ज असतात.

**हात आणि वरच्या टोकाचे ऑर्थोपेडिक्स:**

ही खासियत हात, मनगट, कोपर आणि खांद्यावर परिणाम करणार्या जखमा आणि परिस्थितींचे निदान आणि उपचार यांच्याशी संबंधित आहे. कार्पल टनल सिंड्रोम किंवा रोटेटर कफ टियर्स यांसारख्या परिस्थिती सुधारण्यासाठी हात आणि वरच्या टोकाच्या ऑर्थोपेडिक सर्जन अनेकदा शस्त्रक्रिया करतात.

**पाय आणि घोट्याचे ऑर्थोपेडिक्स:**

औषधाचे हे क्षेत्र पाय आणि घोट्याशी संबंधित समस्या ओळखण्यात आणि त्यावर उपचार करण्यात माहिर आहे, ज्यामध्ये संधिवात, फ्रॅक्चर आणि मोच यासारख्या परिस्थितींचा समावेश असू शकतो. पाय आणि घोट्याच्या ऑर्थोपेडिक सर्जन देखील विकृती सुधारण्यासाठी किंवा खराब झालेले सांधे बदलण्यासाठी शस्त्रक्रिया करू शकतात.

**स्पाइन ऑर्थोपेडिक्स:**

ही खासियत मेरुदंडावर परिणाम करणार्या परिस्थितीचे निदान आणि उपचार करते, जसे की हर्निएटेड डिस्क्स किंवा स्पाइनल स्टेनोसिस. स्पाइन ऑर्थोपेडिक सर्जन वेदना कमी करण्यासाठी आणि गतिशीलता पुनर्संचयित करण्यासाठी स्पाइनल फ्यूजन किंवा डिसेक्टॉमी शस्त्रक्रिया करू शकतात.

**प्राचीन खान्देश-१**

## खानदेशातील अश्मयुगीन स्थळे

# महाराष्ट्र आणि खानदेश

### प्रकरण ३ : विकास आणि नैसर्गिक स्थान

### अजिंठा लेणी

**लेणी क्र. २१ –** लेणी क्र. २१ चा विहार महायानकालीन कलेचा उत्कृष्ट नमुना असून याच्या ओसरीतील भिंतींवर बुद्धाच्या सुंदर प्रतिमा कोरलेल्या आहेत. तर विहाराचा अंतर्भाग बारा सालंकृत स्तंभांनी तोललेला असून त्यावर बोधिसत्वाच्या विविध प्रतिमा कोरलेल्या आहेत. इथल्या चौकटींमधील शिल्पकाम कमालीचे देखणे आहे. तर भिंतीवर एका ठिकाणी भगवान बुद्धाचे प्रवचन देतानाचे चित्र काढलेले आहे. छतावरही रंगकाम केले आहे. त्यातला फुलाफुलांचा निळा रंग अजूनही चांगलाच तकतकीत आहे. हा निळा रंग पर्शिया आणि उत्तर भारतातून आयात केला जात असे. तर गर्भगृहात बुद्धाची ध्यानमग्न अवस्थेतील भलीमोठी मूर्ती असून बाजूला चामरधारी सेवक चवर्या ढाळत उभे आहेत. लेणी नंबर २१ हा बारा विहार आणि दालन आहे. बारा खांब व व्हरांडा आणि खांबावर प्राणी फुले आहेत. तसेच अप्सरा, नागराजा राणी, नमस्ते मुद्रेत भक्तगणही आहे. गर्भगृहात बुद्ध प्रवचनमुद्रेत आहे आणि संपूर्ण आंतरभाग चित्र काढून सजवला असावा कारण चित्रांचे अवशेष दिसतात. यानंतरचे विहार क्र. २२ ते २५ विहार काही साधे तर काही अलंकृत आहेत. पण बहुतेकांच्या ओसरीतील स्तंभांवर नाजूक शिल्पकाम केलेले आहे. ओसरीतील स्तंभ, गर्भगृह, ओसरीतील देखणे नक्षीकाम. शंखनिधी,पद्मनिधी कुबेर आणि लक्ष्मी, सभामंडप आणि विश्रांतीकक्ष, दांम्पत्य, चौकटींमधील सुरेख शिल्पकाम भिंतीवरील बुद्ध प्रवचन देत असलेल्या घटनेचे चित्रीकरण, छतावरील निळ्या रंगात रंगवलेली फुले, गर्भगृहातील ध्यानस्थ बुद्धमूर्ती, भारवाहक यक्ष






**लेणी नंबर २२ –** हा लहान विहार अरूंद व्हरांडा आणि चार अपूर्ण विहार आहे. बुध्द गर्भगृहात प्रलंबपाद अवस्थेत आहे आणि चित्र मानुषी बुद्ध मैत्रेय बुद्धासह आहे. खांबावर एक खंडीत लेख आहे संस्कृतमध्ये म जयत याकडून दान,फ असे लिहिले आहे तर जयत आपल्या कुटुंबाला ममहान उपासकफ असे संबोधले आहे आणि प्रत्येकाला उत्तम ज्ञान आणि पालक मिळो अशी इच्छा व्यक्त केली आहे.




सौ. सरला भिरुड
संशोधक व लेखिका


(क्रमशः)

# मोहक अंदमान बेट

बंगालच्या उपसागरात वसलेली अंदमान बेटे ही नयनरम्य बेटांचा समूह आहे जी त्यांच्या नैसर्गिक सौंदर्यासाठी, आश्चर्यकारक किनारे आणि दोलायमान सागरी जीवनासाठी ओळखली जाते. त्यांचे मूळ पांढरे वाळूचे किनारे, स्फटिकासारखे स्वच्छ नीलमणी पाणी आणि हिरवीगार जंगले यामुळे अंदमान हे उष्णकटिबंधीय नंदनवन शोधणाऱ्या पर्यटकांसाठी एक लोकप्रिय ठिकाण बनले आहे. या लेखात, आम्ही अंदमान पर्यटनाच्या मनमोहक जगाचा शोध घेऊ, त्यातील अद्वितीय आकर्षणे, साहसी क्रियाकलाप आणि सांस्कृतिक अनुभवांवर प्रकाश टाकू.

अंदमान बेटांवर चित्तथरारक समुद्रकिनारे आहेत जे शांतता आणि शांतता देतात. आशियातील सर्वोत्तम समुद्रकिनाऱ्यांपैकी एक म्हणून ओळखल्या जाणार्या हॅवलॉक बेटावरील प्रसिद्ध राधानगर बीचपासून ते नील बेट आणि लाँग आयलंडच्या निर्जन आणि मूळ किनार्यांपर्यंत, प्रत्येक बीचचे स्वतःचे आकर्षण आहे. अभ्यागत सूर्यस्नान, पोहणे, स्नॉर्कलिंग किंवा मनमोहक किनारपट्टीच्या लँडस्केपमध्ये आराम करू शकतात.

अंदमान पर्यटनातील सर्वात उल्लेखनीय पैलूंपैकी एक म्हणजे पाण्याखालील जग. ही बेटे विविध प्रकारच्या सागरी जीवसृष्टीने भरलेली, नेत्रदीपक प्रवाळ खडकांचे घर आहेत. स्नॉर्कलिंग आणि स्कूबा डायव्हिंगचे उत्साही रंगीबेरंगी कोरल गार्डन्स एक्सप्लोर करू शकतात, विदेशी माशांच्या प्रजातींचा सामना करू शकतात आणि भव्य समुद्री कासव आणि मांता किरणांसह अगदी जवळून भेटू शकतात. हॅवलॉक बेट आणि नील आयलंड हे एलिफंट बीच आणि भरतपूर बीच यांसारख्या अपवादात्मक डायव्हिंग स्पॉट्ससाठी प्रसिद्ध आहेत.



इतिहासप्रेमींसाठी, पोर्ट ब्लेअरमधील सेल्युलर जेलला भेट देणे आवश्यक आहे. हे कुप्रसिद्ध वसाहती तुरुंग भारताच्या स्वातंत्र्याच्या लढ्याची एक भयानक आठवण म्हणून उभे आहे. एकेकाळी स्वातंत्र्यसैनिकांना कैद करण्यासाठी वापरलेले हे तुरुंग आता राष्ट्रीय स्मारक आणि संग्रहालय म्हणून काम करते, जे अभ्यागतांना स्वातंत्र्य लढ्यात केलेल्या बलिदानाबद्दल जाणून घेण्याची संधी देते. संध्याकाळी आयोजित केलेला ध्वनी आणि प्रकाश कार्यक्रम कैद्यांच्या कहाण्या सांगतो, देशभक्ती आणि आदराची भावना जागृत करतो.

पोर्ट ब्लेअरपासून एक लहान बोट राइड अभ्यागतांना रॉस बेटावर घेऊन जाते, दाट जंगलांनी वेढलेले आणि प्राचीन समुद्रकिनाऱ्यांनी वेढलेले एक शांत स्वर्ग. एकेकाळी अंदमान बेटांवर ब्रिटीशांचे प्रशासकीय मुख्यालय होते, ते आता त्याच्या वसाहती भूतकाळाची झलक दाखवणारे एक मनमोहक अवशेष म्हणून उभे आहे. बेटाच्या पायवाटेवरून चालताना, अभ्यागत ऐतिहासिक वास्तूंचे अन्वेषण करू शकतात, मैत्रीपूर्ण हरणांना भेटू शकतात आणि बेटाच्या अस्पष्ट सौंदर्याचा आनंद घेऊ शकतात.

अंदमान बेटांवर समृद्ध सांस्कृतिक वारसा असलेल्या स्थानिक जमातींचे निवासस्थान आहे. जरावा, ओंगे आणि सेंटिनेलीज जमाती या बेटांवर हजारो वर्षांपासून वस्ती करत आहेत, त्यांची पारंपारिक जीवनशैली जपत आहेत. पर्यटक जबाबदार सांस्कृतिक दौर्यात गुंतू शकतात, जमातींशी संवाद साधू शकतात, त्यांच्या चालीरीती आणि परंपरा जाणून घेऊ शकतात आणि निसर्गाशी त्यांच्या सुसंवादी अस्तित्वाची अंतर्दृष्टी मिळवू शकतात.

रोमांच शोधणार्यांकडे अंदमानात त्यांच्या एड्रेनालाईनची लालसा पूर्ण करण्यासाठी भरपूर पर्याय आहेत. नॉर्थ बे आयलंडवरील रोमहर्षक समुद्र चालण्यापासून ते रोमांचक जेट स्कीइंग, बनाना बोट राइड आणि राजीव गांधी वॉटर स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समधील पॅरासेलिंगपर्यंत, साहसी क्रियाकलापांची कमतरता नाही. ही बेटे कयाकिंग, पॅडलबोर्डिंग आणि खोल समुद्रातील मासेमारीसाठी देखील संधी देतात, जे साहसी प्रेमींसाठी अविस्मरणीय अनुभव देतात.


रोहित अग्रवाल,
सहा.प्राध्यापक,
हरीभाऊ जावळे इन्स्टीट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट केटरिंग टेक्नॉलॉजी

# देवस्थान :- सांगलीचे आराध्य दैवत, गणपती पंचायतन मंदिर!



कृष्णा नदीच्या काठी हे देऊळ बांधलेले असून पूरापासून ते सुरक्षित रहावे म्हणून या मंदिराची कल्पकतेने उभारणी करण्यात आली आहे. सर्व मंदिराचा आकार तीस/चाळी फूट खोल चुनेगच्चीने भरुन कितीही पाणी वाढले तरी ते देवालयात येणार नाही अशी रचना करण्यात आली आहे. श्री गणपती मंदिर हे सांगली संस्थानचे आराध्य दैवत असून सांगलीकर नागरिकांचे श्रद्धास्थान आहे. केवळ हिंदूच नव्हे तर सर्व धर्मियांची या श्री गजाननावर दृढ श्रद्धा आहे.सध्या गणपती मंदिर परिसर अतिशय देखणा करुन गणपती मंदिर परिसराचा कायापालट करण्यात सांगलीचे राजेसाहेब श्रीमंत पटवर्धन यांनी महत्वाकांक्षी योजना राबविली आहे.

सांगलीचा गणपती आहे सोन्याचा, त्याला बाई आवडे भरजरी शेला' अशी असे सांगलीच्या गणपतीबद्दल म्हटले जाते. सांगलीचे आराध्यदैवत श्री. गणपती पंचायतन मंदिर पटवर्धन घराण्याचे उपास्य दैवत आहे. सांगली संस्थानचे पहिले अधिपती कै. चिंतामणराव थोरलस आप्पासाहेब पटवर्धन यांनी या देवस्थानची स्थापना केली. या शहरास राजधानीचे रूप देण्याचा संकल्प करून त्यांनी गणेशदुर्ग किल्ला आणि गणपती मंदिर उभारले.सुमारे दोनशे वर्षाची परंपरा असणा-या या मंदिराची श्रीमंत विजयसिंहराजे पटवर्धन यांनी अलीकडच्या काळात शोभा वाढविली आहे. पंचायतन, अर्थात पाच मंदिरांनी बनलेले. गणपतीबरोबरच शिव, सूर्य, चिंतामणेश्वरी, लक्ष्मीनारायण देवतांची मंदिरे याठिकाणी आहेत.



**कसे पोहचावे - सांगली रेल्वे स्टेशनपासून सुमारे अडीच कि.मी. अंतरावर सांगली शहरात हे श्री गणपती मंदिर आहे.**

## सुविचार

**आयुष्यात अशा व्यक्तींना महत्व द्या; जे आपल्या पाठीमागे पण आपल्याशी प्रामाणिक असतात.**

## संत तुकाराम सार्थ गाथा



**अभंग क्र. ७०**


गेली वीरसरी । मग त्यासि रांड मारी ।।१।।
मग नये तैसी सत्ता।गेली मागील आणितां ।ध्रु.।
भंगलिया चित्ता । न ये काशानें सांदितां ।।२।।
तुका म्हणे धीर । भंगलिया पाठीं कीर ।।३।।

**अर्थ –**

एखाद्या मनुष्याच्या स्वभावातील वीरत्व गेले तर त्याला कोणीही मान देत नाही एखादी क्षुद्र स्त्रीसुद्धा त्याला मारते .एकदयाची जगात नाचक्की झाली तर पुन्हा त्याला समाजात कोणत्याही प्रकारचा मान सन्मान मिळत नाही .एखादी व्यक्ती मना मधुन उतरली म्हणजे पुन्हा चित्तामधे ती बसत नाही. तुकाराम महाराज म्हणतात, की एखाद्या मनुष्याने आत्मविश्वास जर गमवला तर त्याला जगात सर्व ठिकाणी हार पत्काराचि लागते.

## सप्ताहातील दिनविशेष

दि. ०३ जुलै : गुरुपौर्णिमा
दि. ०४ जुलै : साईबाबा उत्सव समिति शिर्डी.
दि. ०४ जुलै : बाजीप्रभू देशपांडे पुण्यतिथी
दि. ०६ जुलै : संकष्ट चतुर्थी. चंद्रोदय १०:१२ मि.






# पाककृती

## फणसाची कुवरीची भाजी

**लागणारे जिन्नस :** फणसाची कुवरी १ (पौष महिन्यात झाडावर जे फणस धरतात ज्यामध्ये नुकते गरे तयार व्हायला लागतात त्यात आठळया वैगरे काहीही तयार नसते असा फणस भाजीसाठी घ्यावा. पौष महिन्यातील फणस म्हणून या भाजीला पुसभाजी असदेखील म्हणतात) , ठेचलेला लसूण ७ ते ८ पाकळ्या, १ मध्यम आकाराचा बारीक चिरलेला कांदा, कढीपत्ता ५/६ पाने, पाव चमचा हळद, १ चमचा राई, मालवणी मसाला १ ते दीड चमचा, तेल २ चमचे, मीठ आवडीनुसार, किसलेले ओल खोबरे ३ ते ४ चमचे.



**क्रमवार पाककृती:** प्रथम फणसाच्या कुवरीचे काटेरी साल व मधला चिवट भाग (त्याला फणसाची पाव म्हणतात) काढून घेणे. त्यानंतर फणसाचे तुकडे करून मीठ व थोडे पाणी टाकून कूकरला ३ शिट्ट्या काढून वाफवून घेणे. कूकर थंड झाल्यावर हे तुकडे खलबत्त्यात ठेचून बारीक करून घेणे. कढईत तेल तापवून त्यात ठेचलेला लसूण टाकावा लसूण परतून घेतला की त्यात कांदा, राई, कढीपत्ता टाकावा. राई तडतडली की त्यात हळद आणि मालवणी मसाला टाकावा. थोड परतून लगेच ठेचलेला फणस टाकून परतून घ्यावा गरज असल्यास मीठ घालावे व १ वाफ काढून घ्यावी. नंतर भाजी परतून किसलेले ओल खोबरे टाकावे व परतून घ्यावे. फणसाच्या कुवरीची भाजी खाण्यासाठी तयार आहे.

**वाढणी/प्रमाण: –** ४ ते ६ व्यक्तीना भाकरीसोबत खाण्यासाठी

**अधिक टिपा:** तांदळाच्या भाकरीसोबत ही भाजी छान लागते.

नुसत मीठ टाकून वाफवलेले तुकडेही खायला छान लागतात

कुवरीची उपवासाची भाजी करायची असल्यास तेलात जिरे आणि हिरव्या मिरचीचे तुकडे परतून त्यात ठेचलेली कुवरी टाकावी व वरून ओले खोबरे टाकावे. उपवासाची भाजी तयार.

# किचन टिप्स



- ✻ लिंबू जास्त काळ साठवून ठेवायचे असेल तर एअर टाइट कंटेनर हा सर्वोत्तम पर्याय आहे. यासाठी तुम्हाला फक्त ते धुवून वाळवावे लागतील. यानंतर पॉलिथिनमध्ये पॅक करून हवाबंद डब्यात ठेवा. हा डबा फ्रीजमध्ये ठेवा.
- ✻ लिंबू साठवण्यासाठी लिंबुवर तेल लावा आणि त्यांना एका डब्यात ठेवा. हा डबा फ्रिज मध्ये ठेऊ शकता.
- ✻ लिंबू साठवण्यासाठी ॲल्युमिनियम फॉइलमध्ये गुंडाळा. ॲल्युमिनियम फॉइलमध्ये गुंडाळल्याने ओलावा बाहेर जाण्यापासून रोखण्यास मदत होईल. यानंतर तुम्ही लिंबू बराच काळ साठवून ठेवू शकता.
- ✻ कोथिंबीर जास्त काळ टिकण्यासाठी ती निवडून मऊ कापडात अथवा कागदात गुंडाळून ठेवा.
- ✻ गोड पदार्थांसाठी बदाम चिरून टाकायचे असतील तर आधी ते पाण्यात भिजत ठेवा. ज्यामुळे ते सोलणे आणि चिरणे सोपे जाईल.
- ✻ लाकडी चॉपिंग बोर्ड वापरल्यास फळं आणि भाज्या चिरताना चाकूची धार कमी होत नाही.
- ✻ सुकमेवा चॉप करताना तो काही तास फ्रिजमध्ये ठेवा आणि चाकू गरम पाण्याने धुवून घ्या.

आरोग्य क्षेत्रात करीअरची सुवर्ण संधी..!

१२ वी पास

(आर्ट्स, कॉमर्स, सायन्स विद्यार्थीनींसाठी)

महाराष्ट्र शासनाच्या मान्यताप्राप्त, भारतीय परिचर्या परिषद (I.N.C.), महाराष्ट्र परिचर्या परिषद (M.N.C.) आणि महाराष्ट्र राज्य सुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ (MSBNPE) संलग्नीत

गोदावरी कॉलेज ऑफ नर्सिंग
डॉ. केतकी पाटील स्कुल ऑफ नर्सिंग

A.N.M. नर्सिंग कोर्स

वयोमर्यादा : १७ ते ३३ वर्ष / कालावधी - २ वर्ष

शासकीय नियमानुसार मागासवर्गीय (SC/ST) विद्यार्थीनींना शिष्यवृत्ती



-: नोकरीची संधी :-

सिव्हील हॉस्पिटल, ESIC हॉस्पिटल, रेल्वे हॉस्पिटल, प्राआ.केंद्र/उपकेंद्र जिल्हा परिषद, महानगरपालिका, मल्टीस्पेशालिटी, हॉस्पिटल, व खाजगी हॉस्पिटल मध्ये


100% निकालाची परंपरा व नोकरी देणारे एकमेव

नॅशनल हायवे नं.६, खिर्डी शिवार, जळगांव खुर्द - ४२५३०९
9326512739, 9604045737, 9545480498, 0257-2366635/36

# बालकांसाठी ३ ते ५ जुलैला हृदयविकार शस्त्रक्रिया शिबीर

## एएसडी/व्हीएसडी/पीडीए बिनाटाक्याच्या शस्त्रक्रिया मोफत

**जळगाव –** गोदावरी फाऊंडेशन संचलित डॉ.उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व धर्मार्थ रुग्णालयाच्या हृदयालय या विभागातर्फे नवजात शिशू ते १८ वर्षापर्यंतच्या बालकांना असलेल्या हृदयासंबंधित आजारांसाठी शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन केले आहे. ३ जुलै ते ५ जुलै २०२३ दरम्यान हे शिबिर असून त्याकरीता ३ व ४ जुलै रोजी नावनोंदणी करणे अनिवार्य आहे. अनेक बालकांच्या हृदयाला जन्म:च छिद्र असण्याची समस्या दिसून येते. जरी ही समस्या वेळीच ओळखली आणि गरजेनुसार एएसडी/व्हीएसडी किंवा पीडीए या शस्त्रक्रिया तज्ञ डॉक्टरांद्वारे करुन घेतल्यास त्यांचे भविष्य खुप चांगले असते. या दुरदृष्टीने हृदयालयातर्फे बालकांसाठी हृदयविकार निवारण व शस्त्रक्रिया शिबिर आयोजित केले आहे. या शिबिराकरीता खास वाडिया हॉस्पिटल येथील इंटरवेंशनल पेडियाट्रिक कार्डिओलॉजिस्ट डॉ. श्रीपाल जैन सर हे येणार असून ते बालकांवर उपचार करणार आहे. रुग्णांनी सोबत येतांना आधार कार्ड तसेच पिवळे व केशरी रेशन कार्ड घेऊन यावे असे आवाहन हृदयालयातर्फे करण्यात आले आहे. अधिक माहिती व नावनोंदणीसाठी मार्केटिंग विभागप्रमुख रत्नशेखर जैन यांच्याशी ८००७७०५१३७, ७०३०५७११११, ०२५७-२३६६७८८ या क्रमांकावर संपर्क साधावा.



साप्ताहिक गोदावरी परिवार

# शौकखातर जडलेले दारुचे व्यसन अवघ्या १४ दिवसातच सुटले

## वर्क फ्रॉम होममुळे कुटूंबियांनी समजली सवय; संकल्प व्यसनमुक्तीतून रुग्ण ठणठणीत

**जळगाव –** उच्चशिक्षीत २८ वर्षीय तरुण मेट्रो सिटीमध्ये नोकरी करीत असतांना शौकखातर दारुचे व्यसन त्याला जडले. मात्र चारच वर्षात दारुचे व्यसन त्याच्या जीवावर बेतले, आता दारु सोडायची असा निश्चय त्याने करताच गोदावरी फाऊंडेशनच्या संकल्प व्यसनमुक्ती केंद्रातून त्याला आशेचा किरण दिसला आणि आज केवळ १४ दिवसातच त्याचे व्यसन पुर्णत: सोडविण्यात संकल्प केंद्रातील डॉक्टरांच्या टिमला यश आले.

सविस्तर वृत्त असे की, किसन (नाव बदललेले) नामक तरुण हा उच्चशिक्षीत असून नोकरीसाठी तो मेट्रो सिटीत एकटा राहत होता. दरम्यान त्याने लहान भावाचे शिक्षण देखील पूर्ण केले, परंतु दारुचे व्यसन त्याला लागले. दररोज किसनला दारु लागायची, परिणामी भूक कमी लागणे, पोटदुखी होती, हात थरथरणे, ताकत नसणे अशा समस्या भेडसावू लागल्या. किसनला कळून चुकले की, हे सर्व दारुमुळे होत आहे, परंतु आता लागलेली लत कशी सोडवायची ? तेवढ्यातच किसनचा चुलत भाऊ गोदावरी फाऊंडेशनच्या शैक्षणिक संकुलात शिक्षण घेत आहे, त्याने संकल्प व्यसनमुक्ती केंद्राची माहिती देताच किसन आपल्या पालकांसमवेत येथे दाखल झाला.


कोविडपासून वर्क फ्रॉर्म होम सुरु असल्याने किसनच्या दारुचे व्यसन पालकांच्याही लक्षात आले. दर दिवसाला दोन ते तीन क्वॉर्टर दारु पित असून जेवणही त्याचे जवळपास ंद होण्याच्या मार्गावरच गेले होते. आपला जवान मुलगा असा दारुच्या आहारी जात असतांना त्यांचा जीव तीळ तीळ तुटत होता मात्र संकल्प व्यसनमुक्ती केंद्रातून त्यांना मार्ग दिसला. येथे आल्यावर डॉ.विलास चव्हाण, डॉ. गोविंद, डॉ.मुजाहिद, डॉ.विकास, डॉ. आदित्य, डॉ.सौरभ व समुपदेशक बबन ठाकरे यांनी किसनशी गप्पा केल्यात, त्याच्याद्दल जाणून घेत, हसत–खेळत उपचार सुरु केले. उपचाराच्या पहिल्याच दिवशी किसनला दारुची आठवण देखील आली नसल्याचे डॉ. आदित्य जैन यांनी सांगितले.

येथे रुग्ण किसनच्या किडनी व लिवरच्या सर्व प्रकारच्या तपासण्या करण्यात आल्यात, त्यानुसार औषधोपचार सुरु झाला. संकल्प व्यसनमुक्ती केंद्राच्या नियमानुसार ठिक १४ व्या दिवशी किसनचे व्यसन पूर्ण सुटले होते आणि आता दारुकडे कधीच घणारही नाही असा संकल्पही त्याने केला. आपल्या मुलाला चांगल्या मार्गावर आणल्याद्दल किसनच्या पालकांनी संकल्प केंद्राचे आभार मानले.



## दारूमुळे होणारे लिव्हर, पोट व अन्ननलिकेच्या आजार तपासणी शिबीर

**जळगाव –** येथील डॉ. उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालय जळगाव भुसावळ महामार्ग जळगाव खुर्द जळगाव येथे दि. १ जूलै ते ३ जूलै दारूमूळे होणारे लिव्हर,पोट व अन्ननलिकेच्या आजार तपासणी शिबिर आयोजीत करण्यात आले आहे.




या शिरित सकाळी ९ ते ५ या वेळेत प्रसिध्द मेडिसिन तज्ञ तपासणी करणार आहे. शिबिरात लकवा/पॅरेलेसिस मूळे बोबडी वळणे,हात पाय तोड वेडेवाकडे होणे, ब्रेन हॅमरेज, मेंदूत रक्ताच्या गाठी, रक्तस्त्राव, तसेच यामूळे व्हॅल्टीलेटर्सवर गेलेले रूग्ण, किडणी विकार हातापायावर व चेहऱ्यावर सूज, लघवीला त्रास, रक्त कमी होणे, काविळ, निमोनिया,याचबरोबर विविध आजारांची मोफत तपासणी नंतर आवशक्यता भासल्यास ज्या रूग्णांना पुढील उपचाराची गरज असेल त्या रूग्णांना मोफत उपचार सुविधा महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेत करून दिली जाणार आहे. शिबिरासाठी तज्ञ डॉक्टरांची टीम कार्यरत करण्यात आली असून, २४ तास अतिदक्षता विभाग तसेच व्हॅल्टीलेटर्सची उपलब्धता करून देण्यात आली आहे तसेच प्रशस्त वार्ड देखिल उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

याचबरोबर रक्त,लघवी आणि इतर तपासण्यांची देखिल अल्पदरात सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. पॅरेलेसिस, लकवा रूग्णांकरीता तज्ञ फिजीओथेरेपीस्ट व्दारा मोफत व्यायाम व उपचार तसेच सल्ला दिला जाणार आहे. हे शिबीर फक्त तिन दिवसासाठी डॉ. उल्हास पाटील वैद्यकिय व धर्मदाय रूग्णालय जळगाव भुसावळ महामार्ग जळगाव खुर्द जळगाव येथे आयोजित केले आहे.

**अधिक माहितीसाठी संपर्क डॉ. हेत्वी ७०८३९६६१२६ किंवा डॉ. मोमीन ८६२०००९०० या क्रमांक वर संपर्क साधावा.**

## नवजात शिशू व लहान मुलासाठी मोफत तपासणी शिबिराचे आयोजन

**जळगाव –** येथील डॉ. उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालय जळगाव भुसावळ महामार्ग जळगाव खुर्द जळगाव येथे दि. १ जूलै ते ३ जूलै नवजात शिशू व लहान मुलांसाठी मोफत तपासणी शिबिर आयोजीत करण्यात आले आहे.



या शिबिरात सकाळी ९ ते ५ या वेळेत प्रसिध्द बालरोग तज्ञ तपासणी करणार आहे. शिबिरात कमी वजनाचे बाळ, अपुर्ण दिवसाचे बाळ, काविळ, जंतू संक्रमण,जन्मदोष तसेच फुफुस्साच्या आजार तसेच लहान मुलांमधील न्युमोनिया, टायफाईड, काविळ, लहान मुलांचा पॅरेलेसिस, मेंदूचे झटके, डोक्यात ताप जाणे, अर्धांगवायुचा झटका याचबरोबर विविध आजारांची मोफत तपासणी नंतर आवशक्यता भासल्यास ज्या रूग्णांना पुढील उपचाराची गरज असेल त्या रूग्णांना मोफत उपचार सुविधा महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेत करून दिली जाणार आहे.


शिबिरासाठी बालरोग तज्ञ डॉक्टरांची टीम कार्यरत करण्यात आली असून, २४ तास नवजात शिशू अतिदक्षता विभाग तसेच व्हॅल्टीलेटर्सची याचबरोबर नवजात बाळासाठी मोफत पेटीची वार्मर उपलब्धता करून देण्यात आली आहे तसेच प्रशस्त वार्ड देखिल उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. याचबरोबर रक्त,लघवी आणि इतर तपासण्यांची देखिल अल्पदरात सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. पॅरेलेसिस,लकवा रूग्णांकरीता तज्ञ फिजीओथेरेपीस्ट व्दारा मोफत व्यायाम व उपचार तसेच सल्ला दिला जाणार आहे. हे शिबिर फक्त तिन दिवसासाठी डॉ. उल्हास पाटील वैद्यकिय व धर्मदाय रूग्णालय जळगाव भुसावळ महामार्ग जळगावखुर्द जळगाव येथे आयोजित केले आहे.

**अधिक माहितीसाठी संपर्क डॉ. चंदाराणी ९३०९७०७३९२ या क्रमांक वर संपर्क साधावा.**



## मानसिक आजार व व्यसनमुक्ती तपासणी शिबिराचे आयोजन

**जळगाव –** येथील डॉ. उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालय जळगाव भुसावळ महामार्ग जळगाव खुर्द जळगाव येथे दि. १ जूलै ते ३ जूलै मानसिक आजार व व्यसनमुक्ती तपासणी शिबिर आयोजीत करण्यात आले आहे.



या शिबिरात सकाळी ९ ते ५ या वेळेत प्रसिध्द मानसोपचार तज्ञ तपासणी करणार आहे. शिबिरात अर्धशिशी, डोके दुखणे, फिटस, मिर्गी, स्मृती भ्रंश, लहान मुलांच्या मानसिक समस्या, नैराश्य, लैंगिक समस्या तसेच व्यसनाधिनता यावर मानसोपचार तज्ञ मोफत तपासणी करणार आहे. याचबरोबर आवशक्यता भासल्यास ज्या रूग्णांना पुढील उपचाराची गरज असेल त्या रूग्णांना महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेत उपचाराची सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. शिबिरासाठी मानसोपचार तज्ञ डॉक्टरांची टीम कार्यरत करण्यात आली आहे तसेच प्रशस्त वार्ड देखिल उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. याचबरोबर रक्त,लघवी आणि इतर तपासण्यांची देखिल अल्पदरात सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. संकल्प व्यसनमुक्ती केंद्राच्या माध्यमातून व्यसन सोडवण्यासाठी सायकॉजीस्ट व्दारामोफत सल्ला दिला जाणार आहे. हे शिबिर फक्त तिन दिवसासाठी डॉ. उल्हास पाटील वैद्यकिय व धर्मदाय रूग्णालय जळगाव भुसावळ महामार्ग जळगाव खुर्द जळगाव येथे आयोजित केले आहे.



**अधिक माहितीसाठी संपर्क : डॉ. विकास ९५०३०९६५६५**
**डॉ. आदित्य ९४०४४७६१११**

## कंबरदुखी, पाठदुखी, मणके विकार व आथ्रोस्कोपी शिबीर

**जळगाव –** येथील डॉ. उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालय जळगाव भुसावळ महामार्ग जळगाव खुर्द जळगाव येथे दि. १ जूलै ते ३ जूलै कंबर,पाठदुखी मणकेविकार व आथ्रोस्कोपी तपासणी शिबिर आयोजीत करण्यात आले आहे.



या शिरित सकाळी ९ ते ५ या वेळेत प्रसिध्द अस्थीरोग तज्ञ तपासणी करणार आहे. शिबिरात तिरकेपणा, मणक्यास मार, मणक्याच्या गाठी, हातापायाला मुंग्या येणे, पाठदुखी, मानदुखी, कंबर दुखी आदि मणक्याशी संबंधित आजारांची मोफत तपासणी केली जाणार आहे. तपासणी नंतर आवशक्यता भासल्यास ज्या रूग्णांना शस्त्रक्रियेची गरज असेल त्या रूग्णांना मोफत शस्त्रक्रियेची सुविधा महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेत करून दिली जाणार आहे.

शिबिरासाठी तज्ञ डॉक्टरांची टीम कार्यरत करण्यात आली असून, अत्याधुनिक ऑपरेशन थिएटर तसेच प्रशस्त वार्ड देखिल उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. याचबरोबर रक्त, लघवी आणि इतर तपासण्यांची देखिल अल्पदरात सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. शस्त्रक्रियेनंतर तज्ञ फिजीओथेरेपीस्ट व्दारा मोफत व्यायाम व उपचार तसेच सल्ला दिला जाणार आहे. हे शिबिर फक्त तीन दिवसासाठी डॉ. उल्हास पाटील वैद्यकिय व धर्मदाय रूग्णालय जळगाव भुसावळ महामार्ग जळगावखुर्द जळगाव येथे आयोजित केले आहे.याचबरोबर गुडघेदुखी, खांदेदुखी, खांदा वारंवार निसटणे, लिगामेंट समस्या, गुडघा लचकणे, वेदना होणे,इ आजारांची मोफत तपासणी केली जाणार आहे.

**अधिक माहितीसाठी संपर्क डॉ. प्रसाद ९७६६६८८५३८ डॉ. पियुष ९६२३०४३६२३.**

## रोजगार वार्ता

### पश्चिम रेल्वेत अप्रेंटिस पदाच्या ३६२४ जागा

**पदाचे नाव:** अप्रेंटिस (प्रशिक्षणार्थी)
**अ. क्र. ट्रेड**
१ फिटर १० इलेक्ट्रिशियन
२ वेल्डर ११ इलेक्ट्रॉनिक्स मेकॅनिक
३ टर्नर १२ वायरमन
४ मशीनिस्ट १३ मेकॅनिक Reff. AC
५ कारपेंटर १४ पाईप फिटर
६ पेंटर (G) १५ प्लंबर
७ मेकॅनिक (डिझेल) १६ ड्राफ्ट्समन (सिव्हिल) ८ मेकॅनिक (मोटार व्हेईकल) १७ स्टेनोग्राफर
९ PASAA **शैक्षणिक पात्रता:** (i) ५०% गुणांसह १०वी उत्तीर्ण (ii) संबंधित ट्रेड मध्ये NCVT/SCVT **वयाची अट:** २१ जून २०२३ रोजी १५ ते २४ वर्षे SC/ST:०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट **नोकरी ठिकाण:** पश्चिम रेल्वे (महाराष्ट्र) Fee: General/OBC: 100/- SC/ST/PWD/महिला: फी नाही Online **अर्ज करण्याची शेवटची तारीख:** २६ जुलै २०२३

पान 9 वरून

### महात्मा ज्योतिबा फुले योजनेंतर्गत उपचार

**मणक्याच्या शस्त्रक्रियेद्वारे ...**

याबाबत अस्थिरोग विभागातील निवासी डॉक्टर चाणक्य यांनी माहिती दिली की, सदर रुग्ण येथे आला असता तो व्हीलचेअर वर आला होता. त्याच्या लक्षणानुसार सर्वप्रथम एमआरआय करून घेण्यात आला त्यात रुग्णाला कमरेच्या मणक्यातील गादी मागे सरकली असल्याचे निदान झाले. त्यामुळे रुग्ण कंबरदुखी, पायदुखी, हाता पायाला मुंग्या येणे या समस्येने बेजार झाला होता. अशा रुग्णांना शस्त्रक्रियेची गरज असते. त्यानुसार मणका विकार शल्य चिकित्सक डॉ प्रमोद सारकेलवाड यांनी भुल रोग तज्ञ डॉ देवेंद्र चौधरी, डॉ शीतल यांच्या साहाय्याने शस्त्रक्रिया केली. तसेच निवासी डॉ चाणक्य, पियूष, गौतम यांचेही अनमोल सहकार्य लाभले.

**योजना रुग्णांसाठी लाभदायी**

**मणका शस्त्रक्रिया या महात्मा ज्योतिबा फुले योजनेत मोफत केल्या जातात. त्याकरिता रुग्णांनी सोबत येताना आधार कार्ड व रेशन कार्ड घेऊन यावे. मोफत उपचारामुळे ही योजना रुग्णांसाठी लाभदायी ठरतेय.**

--------------------

**फिजिओथेरपी लाभदायी**

रूग्णालयात एकाच छताखाली सर्व सुविधा उपलब्ध आहे. त्यात फिजिओथेरपीचाही समावेश आहे. सदर रुग्णाला शस्त्रक्रिये नंतर फिजिओथेरपिस्ट डॉ सौरभ पाटील यांनी व्यायाम शिकवले. त्यामुळे रुग्ण लवकरच बरा होऊन चालू लागला.

डॉ.उल्हास पाटील धर्मार्थ रूग्णालय जळगांव

महात्मा ज्योतिबा फुले योजने अंतर्गत गोदावरी फाऊंडेशन यांच्यातर्फे भव्य महाआरोग्य तपासणी व रक्तदान शिबिरांचे आयोजनासाठी

✻ संपर्क ✻
वैद्यकीय शिबीर समन्वयक
लक्ष्मण पाटील ९३२६१५०००६

ऑनलाईन साप्ताहिक वाचण्यासाठी
आमचा क्युआर कोड स्कॅन करा.

साप्ताहिक
RNI Regd. No.: MAHMAR/1999/7490

# गोदावरी

परिवार पोस्ट रजि.नं.-AR/TECH NO RNP-JAL/120/2019-21

* वर्ष २४ वे * अंक २६ * सोमवार २६/०६/२०२३ * डाक २८/०६/२०२३ * पाने - ६ * किंमत २ रुपये

गुरुवार, दि. २९ जून
देवशयनी आषाढी एकादशी



गुरुवार, दि. २९ जून
बकरी ईद

# आता तीळ, मस, टॅटू काढणे सहज शक्य

## डॉ. उल्हास पाटील रूग्णालयात एव्हरयुथ स्कीन आणि लेझर क्लिनीकचे थाटात उद्घाटन





**जळगाव - टॅटू, मस, तीळ, जन्मजात व्रण आणि डाग काढण्याची आधुनिक सुविधा आता डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय रूग्णालयात उपलब्ध करून देण्यात आली आहे. डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय रूग्णालयात त्वचारोग विभागांतर्गत एव्हरयुथ स्कीन आणि लेझर क्लिनीकचे महाविद्यालयाचे चेअरमन डॉ. उल्हास पाटील यांच्या हस्ते मोठ्या थाटात फित कापून उद्घाटन करण्यात आले.**

खान्देशसह विदर्भातील गरजू रूग्णांसाठी डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय धर्मार्थ रूग्णालयातर्फे विविध प्रकारच्या आजारांवर आधुनिक उपचार पध्दती उपलब्ध करून दिली जाते. सध्याच्या धकाधकीच्या जीवनात अनेक जण त्वचेविषयी अधिक जागरूक असतात. मात्र खात्रीशीर उपचाराच्या सुविधा तोकड्या आणि खर्चिक स्वरूपाच्या असल्याने अनेकजण त्याकडे दुर्लक्ष करतात. अशा सर्व रूग्णांसाठी डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय रूग्णालयात आता एव्हरयुथ स्कीन आणि लेझर क्लिनीकचा शुभारंभ चेअरमन डॉ. उल्हास पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. **(पान २ वर)**

### असे आहे लेझर क्लिनीक

**डॉ. उल्हास पाटील रूग्णालयाच्या लेझर क्लिनीकमध्ये क्यू स्वीच एनडीयाग लेझर ही आधुनिक मशिन उपचारासाठी उपलब्ध आहे. अंगावरील टॅटू काढुन टाकणे, जन्मजात खुणा, काळे तीळ काढुन टाकणे आणि त्वचेला उजळवणे हे उपचार या मशिनद्वारे होतात. दुसऱ्या लाँग पल्स एनडीयाग लेझर या मशिनच्या सहाय्याने अंगावरील नको असलेले केस काढता येणार आहे. तसेच सीओ२ लेझर मशिनद्वारे मुरूमानंतरचे व्रण, खड्डे, काळे डाग, कांजण्यानंतरचे डाग, मस काढणे, स्कीन लेझर रिजुव्हीनेशन हे उपचार केले जाणार आहेत. महिला रूग्णांसाठी या क्लिनीकमध्ये स्वतंत्र महिला डॉक्टरकडून उपचार केले जाणार आहेत. तसेच हे सर्व उपचार हे सवलतीच्या दरात करण्यात येणार असून गरजू रूग्णांनी या क्लिनीकचा लाभ घ्यावा असे आवाहन त्वचारोग तज्ञ डॉ. पंकज तळेले यांनी केले आहे.**



# मायक्रोलॅरींजल शस्त्रक्रियेने ५८ वर्षीय रुग्ण बोलू लागल्या गोड वाणी

## डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय रूग्णालयात तज्ञ डॉक्टरांकडून शस्त्रक्रिया यशस्वी

**जळगाव** - घशातील त्रासामुळे बदललेल्या आवाजावर डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय रूग्णालयात मायक्रोलॅरींजल शस्त्रक्रिया करण्यात आली. तज्ञ डॉक्टरांच्या अनुभवाच्या बळावर ही शस्त्रक्रिया यशस्वी ठरली अन् ५८ वर्षीय महिला रूग्णाचा बदललेला आवाज पूर्ववत झाला.

याबाबत माहिती अशी की, जळगाव जिल्ह्यातील दोनगाव येथील मीराबाई पाटील (वय ५८) ह्या शेतीकाम करतात. गत दोन महिन्यांपासून त्यांना घशात त्रास होत होता. स्थानिक डॉक्टरांना त्यांनी दाखविले असता तात्पुरते उपचार करण्यात आले. मात्र हा त्रास अधिकच वाढल्याने मीराबाई पाटील यांना जेवण्यास आणि बोलण्यास मोठी अडचण निर्माण झाली होती.

अशा वेळी मीराबाई पाटील यांनी डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय रूग्णालय गाठले. याठिकाणी नाक-कान-घसा विभागात मीराबाई पाटील यांची तपासणी करण्यात आली. या तपासणीत सिस्टीक लिजन ओव्हर व्होकल कॉर्ड असल्याने त्यांच्या आवाजात बदल झाल्याचे निदान करण्यात आले.

यावेळी मीराबाई पाटील यांच्यावर शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानंतर मीराबाई पाटील यांची मायक्रोलॅरींजल शस्त्रक्रिया करण्यात आली. नाक-कान-घसा तज्ञ डॉ. अनुश्री अग्रवाल, डॉ. विक्रांत वझे, डॉ. पंकजा बेंडाळे यांनी केलेली शस्त्रक्रिया यशस्वी झाली अन् मीराबाई गोड वाणी पुन्हा बोलू लागल्या. या शस्त्रक्रियेसाठी डॉ. तृप्ती भट, डॉ. चारू सोनवणे, डॉ. रितु रावल, डॉ. जान्हवी बनकर, डॉ. बासु, भूलतज्ञ डॉ. सतीश आणि टीम यांनी सहकार्य केले.

# सत्यवानाच्या सावित्रीला मृत्युच्या दाढेतून खेचून आणण्यात हृदयालयाला यश

## तात्पुरता पेसमेकर व तातडीच्या एन्जीओप्लास्टीने रुग्णाचा पुनर्जन्म

**जळगाव** - ४१ वर्षीय महिला रुग्णाला तीव्र हृदयविकारचा झटका येवून हृदयाचे ठोके देखील २५ ते ३० इतके कमी झाले होते, शुगर ६०० च्यावर आणि रक्तदाब अतिशय कमी अशातच बेशुद्धवस्थेत व्हेंटीलेटर लावून हृदयविकार तज्ञांद्वारे तातडीने टेम्परारी पेसमेकर एन्जीओप्लास्टी करण्यात आली. तज्ञ फिजीशियन आणि कॉर्डीओलॉजीस्टच्या परिश्रमाने सत्यवानाच्या सावित्रीला हृदयालयातून जीवनदान मिळाले असून रुग्णाचा पुनर्जन्मच झाला, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

वटपौर्णिमेच्या उपवासानंतर प्रकृती बिघडलेल्या ४१ वर्षीय महिला रुग्णावर जळगाव शहरातील खाजगी इस्पीतळात उपचार झाले. रुग्णाला मधुमेह व उच्च रक्तदाबाचीही समस्या होती. पाठीतून कळ येत हृदयविकारचा झटका येताच रुग्णाची शुद्ध हरपली. तातडीने खाजगी इस्पीतळात नेले असता गोदावरीच्या डॉ. उल्हास पाटील धर्मदाय रूग्णालयातील अतिदक्षता विभागात दाखल करण्यात आले.अवघ्या अर्ध्यातासातच एन्जीओग्राफी व एन्जीओप्लास्टी करणे गरजेचे आहे हे लक्षात घेत येथे शुगर कमी तसेच रक्तदाब स्थिर करण्यासाठी संपुर्ण फिजिशियनची टीम कामाला लागली.रुग्णालयात आल्यावर वेळ वाया न घालता परिस्थितीनुसार रुग्णाला तातडीने अतिदक्षता विभागातील तज्ञांनी व्हेंटीलेटर लावून रक्तदाब व शुगर स्थिर करत हदयरोग तज्ञांना बोलावण्यात आले. फिजीशियन आणि हदयरोग तज्ञांच्या चर्चेनंतर थेट कॅथलॅबमध्ये घेण्यात आले. याप्रसंगी रुग्णाचा बीपीही लागत नव्हता तसेच हृदयाची गती कमी झाली होती. हृदयाचे ठोके २५ ते ३० इतके कमी झाले होते, अगदी कमी वेळ रुग्णाजवळ होता, हृदयालयातील डीएम कार्डिओलॉजिस्ट डॉ. वैभव पाटील व डॉ. सुमित शेजोळ यांनी **(पान २ वर)**

### सुविधांमूळे अशक्य ते शक्य



रूग्णालयात एकाच छताखाली सर्व सुविधा असून फिजीशियनची टीमही २४ तास उपलब्ध असते. संपुर्ण अनुभव कौशल्य उपयोगात आणून प्रकृती स्थीर करण्यावर भर देत अतिदक्षता विभागातील टिमच्या परिश्रमाला यश आल्याचे समाधान आहे असे डॉ. जिवक यांनी सांगितले.



### छातीच्या दुखण्याकडे दुर्लक्ष नको

हृदयविकाराचा झटका येण्यासाठी वयाची बंधने राहिली नसून छातीच्या दुखण्याकडे आता दुर्लक्ष करायला नको. ह्या रुग्णाकडे अगदी कमी वेळ शिल्लक होता, शस्त्रक्रिया करणे खूप मोठे आव्हान होते, मात्र अत्याधुनिक कॅथलॅब, आमची उत्तम प्रशिक्षीत टिम आणि नातेवाईकांचा विश्वास या सर्व गोष्टी एकत्रित जुळून येत रुग्ण व्हेंटीलेटरवरुन सुखरुप परत आल्याचे डीएम कार्डिओलॉजिस्ट डॉ.वैभव पाटील व डॉ.सुमित शेजोळ यांनी सांगितले.

### डॉक्टरांचे खुप खुप आभार

माझ्या पत्नीची प्रकृती अत्यंत क्रिटीकल झाली होती. अखेरचे काही मिनीटच तिच्याकडे उरले होते. अतिदक्षता विभागातील फिजिशियन व हृदयरोग तज्ञ डॉक्टरांनी सांगितले १०० टक्के प्रयत्न करु आणि डॉक्टरांच्या प्रयत्नाला यश आले. आज माझी पत्नी मेजर हार्टअटॅकच्या धक्क्यातून सुखरुप बचावली. येथील सेवा खरोखरच वाखाण्याजोगी असून मी आभारी आहे.

**- श्री राजेंद्र,रुग्णाचे पती**

# आरोग्य शिबीरांनी दिला सशक्तीकरणाचा संदेश

## महाआरोग्य शिबिरांना ग्रामीण भागातून उदंड प्रतिसाद

**जळगाव – गोदावरी फाऊंडेशन संचलित डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व धर्मार्थ रूग्णालयाच्या माध्यमातून ग्रामीण भागात सुरू असलेल्या आरोग्य शिबिरांच्या माध्यमातून सशक्तीकरणाचा संदेश दिला जात आहे. दरम्यान ग्रामीण भागातून या महाआरोग्य शिबिरांना उदंड प्रतिसाद मिळत आहे.**




## जंगलतांड्यात १२५ जणांची तपासणी

सोयगाव तालुक्यातील जंगलतांडा येथे आयोजित महाआरोग्य शिबिरात १२५ जणांची तपासणी करण्यात आली. या शिबिराचे आयोजन सरपंच जेसोबाई मोरसिंग राठोड, उपसरपंच मिश्रीलाल गरमक राठोड यांच्या उपस्थितीत करण्यात आले. शिबिरासाठी ग्रामपंचायत सदस्यांनी सहकार्य केले.



## कोऱ्हाळा बाजार येथे १४५ जणांची तपासणी

मोताळा तालुक्यातील कोऱ्हाळा बाजार येथे मोफत इसीजी, कार्डीओग्राफ रक्तदाब तपासणी करण्यात आली. या शिबिरात १४५ जणांची आरोग्य तपासणी करून त्यापैकी ३८ जणांना पुढील उपचारासाठी डॉ. उल्हास पाटील रूग्णालयात पाठविण्यात आले. शिबिरासाठी सरपंच शोभाबाई समाधान गायकवाड, उपसरपंच गजानन समाधान बोडखे व ग्रामपंचायत सदस्यांनी सहकार्य केले.

## चौथा येथील शिबिराला प्रचंड प्रतिसाद

बुलढाणा जिल्ह्यातील चौथा येथे आयोजित शिबिराला प्रचंड प्रतिसाद मिळाला. ग्रामस्थांनी आरोग्य तपासणी करून घेण्यासाठी गर्दी केली होती. शिबिरात २२० जणांची तपासणी करण्यात आली. यावेळी सरपंच शारदा गजानन गायकवाड, उपसरपंच वंदना संतोष नप्ते हे उपस्थित होते. शिबिरासाठी सर्व ग्रामपंचायत सदस्यांनी सहकार्य केले.





## निमगावात हृदय विकाराबाबत मार्गदर्शन

नांदुरा तालुक्यातील निमगाव येथे महेंद्र मुकुंदराव भोपळे, योगेश चावरे यांच्या माध्यमातून आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबीरात नाक-कान-घसा, नेत्रालय, स्त्रीरोग विभाग, अस्थिरोगाशी संबंधित तपासण्या करण्यात आल्या. तसेच लिव्हर, पित्ताशयाचे व पोटाचे आजाराचीही तपासणी करण्यात आली. या शिबिरात १७८ जणांची तपासणी करण्यात आली.

## पान्हेरा: शिबिरास उत्स्फुर्त प्रतिसाद

बुलडाणा जिल्ह्यातील मोताळा तालुक्यातील पान्हेरा ग्रामपंचायत येथे आयोजित शिबिराला ग्रामस्थांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. याठिकाणी ८५ जणांची आरोग्य तपासणी करण्यात आली असून त्यापैकी २२ जणांना पुढील उपचारासाठी वैद्यकीय रूग्णालयात पाठविण्यात आले. या शिबिराचे आयोजन सरपंच किरण एकनाथ काटकर, उपसरपंच संजय प्रल्हाद वैराळकर, सुनील रामचंद्र वैराळकर यांच्या उपस्थितीत पार पडले.



## रोजगार वार्ता

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापी २९० जागा**

सहायक प्राध्यापक ४५, शिक्षक २४५ **शैक्षणिक पात्रता:** पद क्र.१: M.Sc./M. Tech./NET/Ph.D. पद क्र.२: M.Sc./M.Tech./ M.E./ SET/ NET/ Ph.D. **नोकरी ठिकाण:** औरंगाबाद Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: २६ जून २०२३ **अर्जाची प्रिंट पोस्टाने पाठविण्याची शेवटची तारीख** (सहायक प्राध्यापक): ३० जून २०२३ **अधिकृत वेबसाईट:** http://www.bamu.ac.in/

----------

**महाराष्ट्र वन विभागात २४१७ जागा**

**पद क्र. पदाचे नाव पद संख्या**

१ वनरक्षक (गट क) २१३८
२ लेखापाल (गट क) १२९
३ सर्वेक्षक (गट क) ८६
४ लघुलेखक (उच्चश्रेणी) (गट ब) १३
५ लघुलेखक (निम्नश्रेणी) (गट ब) २३
६ कनिष्ठ अभियंता(स्थापत्य)(गट ब) ०८
७ वरिष्ठ सांख्यिकी सहाय्यक(गट क) ०५
८ कनिष्ठ सांख्यिकी सहाय्यक(गट क) १५

**नोकरी ठिकाण:** संपूर्ण महाराष्ट्र. Online **अर्ज करण्याची शेवटची तारीख:** ३० जून २०२३. **अधिकृत वेबसाईट:** https://mahaforest.gov.in/

----------

**नॅशनल हायड्रोइलेक्ट्रिक पॉवर कॉर्पोरेशन लि. ३८८ जागा**

**पद क्र. पदाचे नाव पद संख्या**

१ ज्युनियर इंजिनिअर (सिव्हिल) १४९
२ ज्युनियर इंजिनिअर (इलेक्ट्रिकल) ७४
३ ज्युनियर इंजिनिअर (मेकॅनिकल) ६३
४ ज्युनियर इंजिनिअर (ए उ) १०
५ सुपरवाइजर (IT) ०९
६ सुपरवाइजर (सर्व्हे) १९
७ सिनियर अकाउंटेंट २८
८ हिंदी ट्रांसलेटर १४
९ ड्राफ्ट्समन (सिव्हिल) १४
१० ड्राफ्ट्समन (इलेक्ट्रिकल/ मेकॅ.) ०८

**नोकरी ठिकाण:** संपूर्ण भारत किंवा परदेशात. Online **अर्ज करण्याची शेवटची तारीख:** ३० जून २०२३ **अधिकृत वेबसाईट:** (NHPC)

-----

**टेलीमॅटिक्स विकास केंद्र २५२ जागा**

**पदाचे नाव:** सॉफ्टवेयर इंजिनिअर, RF इंजिनिअर, डेवलप्मेंट इंजिनिअर आणि इतर पदे. **शैक्षणिक पात्रता:** (i) BE/B.Tech/ME/M.Tech/ MBA/Ph.D (ii) **अनुभव. नोकरी ठिकाण:** दिल्ली बेंगळुरू. Fee: **फी नाही.** Online **अर्ज करण्याची शेवटची तारीख:** ३० जून २०२३ **अधिकृत वेबसाईट:** https://www.cdot.in/cdotweb/web/home.php



कॅम्पचे पॅम्पलेट वाटप करताना.

## (पान १ वरुन) आता तीळ, मस, टॅटू...

यावेळी उपचारासाठी आवश्यक असलेल्या तीन आधुनिक मशिनची महाविद्यालयाचे अधीष्ठाता डॉ. एन.एस. आर्विकर, डॉ. ए.जी. बडगुजर यांच्या हस्ते पूजन करण्यात आले. याप्रसंगी त्वचारोग तज्ञ डॉ. पंकज तळेले, डॉ. स्वप्नील पाटील, डॉ. दिनेश कुलाल, डॉ. चेतना शंकलेशा, डॉ. सारा खान,. डॉ. सागरिका धवन, नर्सिंग विभागाच्या अश्विनी टोणपे, वरीष्ठ अकाऊंटंट रमाकांत पाटील, अजय वाणी, प्रशासन अधिकारी अशोक भिडे, अशोक बऱ्हाटे, जितू पाटील, लिपीक सुशील विसपुते, प्रतिभा पाटील आदी उपस्थित होते.

## सत्यवानाच्या सावित्रीला मृत्युच्या दाढेतून...

रुग्णाला ऑपरेट करत सर्वप्रथम हृदयाचे ठोके वाढण्यासाठी टेम्पररी पेसमेकर टाकण्यात आला. त्यानंतर लगेचच हृदयाला रक्तपुरवठा करणाऱ्या उजव्या बाजूकडील मुख्य रक्तवाहिन्या १०० टक्के बंद असल्याने लगेचच एन्जीओप्लास्टीही करण्यात आली. ही सर्व प्रक्रिया रुग्ण व्हेंटीलेटरवर होता त्यावेळी सुरु होती. दरम्यान रुग्णाची शुगर ५०० हून अधिक होती तर बीपी लागत नव्हता तसेच या क्रिटीकल परिस्थीतीमुळे एकेक अवयवावर परिणाम होण्यास सुरुवात झाली होती. रक्तातील पी.एच. हा ६.९ एवढा होता. तातडीने शस्त्रक्रिया गृहात उपचार झाले त्यानंतर फिजिशियन व हृदयरोग तज्ञांनी २४ तास लक्ष देत दोन दिवसांनी व्हेंटीलेटर काढण्याचा निर्णय घेतला. सदर रुग्ण महिलेचा हृदयालयातील उपचारामुळे पुनर्जन्मच झाला. महात्मा ज्योतिबा फुले योजनेंतर्गत रुग्णावर उपचार झाले असून पाचव्याच दिवशी डिस्चार्ज देण्यात आला.

संपादक : सुभाष पाटील (रजि. न्युजपेपर) साप्ताहिक गोदावरी परिवार : मालक, प्रकाशक, मुद्रक : डॉ. सौ. वर्षा पाटील यांनी अक्षरमुद्रा प्रिंटर्स, प्लॉट नं.६, कलेक्टर बंगल्याच्या बाजूला, साने गुरूजी कॉलनी, जळगांव येथे छापून गोदावरी हॉस्पीटल, भास्कर मार्केट जवळ, जळगांव येथे प्रसिद्ध केले. फोन नं. २२२१८३४/३५, अंकात बातम्या प्रसिध्द करण्यासाठी या ईमेलवर पाठवाव्यात Email : godavari.parivar@gmail.com(अंकात प्रकाशित झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

# गोदावरी नर्सिंग महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा

**जळगाव – येथील गोदावरी फाऊंडेशनच्या विविध संस्थामध्ये आंतरराष्ट्रीय योगा दिन साजरा करण्यात आला. यावेळी डॉ उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालय व धमार्थ रूग्णालयात सारा हॉलमध्ये योगशिक्षक योगेश पाटील यांनी प्रशिक्षण दिले.वैद्यकिय अभ्यासक्रमाचे सर्व विदयार्थी यावेळी उपस्थित होते. विदयार्थ्यांनी योगा व्यायामाचे प्रात्यक्षिकही सादर केले. यावेळी मान्यवरांनी योगादिनाचे महत्व विषद करून सांगीतले. अधिष्टाता डॉ. एन एस आर्विकर, प्रशासन अधिकारी प्रमोद भिरूड, डॉ. विठठल शिंदे,क्रिडा संचालक रितेश तायडे यांचेसह सर्व विभागाचे प्रमुख डॉक्टर व प्राध्यापक तसेच कर्मचारी उपस्थीत होते.**







## डॉ उल्हास पाटील कॉलेज ऑफ फिजिओथेरेपी

येथे वसुधैव कुटुंबकम् साठी योग या थीम अंतर्गत आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला.यावेळी योगशिक्षक योगेश पाटील व सहका—यांनी योगाचे प्रशिक्षण दिले.

प्राचार्य डॉ. जयवंत नागुलकर,डॉ.अनुराग मेहता, डॉ.चैताली नेवे आणि डॉ.प्रीती पाटील, प्रशासन अधिकारी राहूल गिरी यांचेसह डॉक्टर व प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.यावेळी योगा जनजागृतीपर पुस्तिकेचे वाटपही ओपीडीमधील रूग्णांना करण्यात आले.

## गोदावरी कॉलेज ऑफ नर्सिंग

येथे वसुधैव कुटुंबकम् साठी योग या थीम अंतर्गत आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. गोदावरी कॉलेज ऑफ नर्सिंग येथे योगशिक्षीका सरला साठे यांनी प्रशिक्षण दिले. महाविद्यालयाच्या मैदानात (किवा तेवन) मध्ये योग सत्र झाले. सर्व विद्यार्थी. कार्यक्रमात नर्सिंग सहभागी झाले होते.सत्राची सुरुवात सकाळी ७.०० वाजता वॉर्मअप आणि सूर्यनमस्काराने झाली. योगशिक्षिका श्रीमती सरला साठे यांनी सत्राचे नेतृत्व केले. योग दिन आणि आपल्या दैनंदिन जीवनात योगाचे महत्त्व याविषयी त्यांनी माहिती दिली.प्राचार्यांनी आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या उत्पत्तीचा उल्लेख करण्यात आला आहे. अर्थात, योग ही एक प्राचीन शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक प्रथा आहे जी भारतात उगम पावली आहे. उपप्राचार्य विशाखा वाघ, एम.एस. यांच्या निरीक्षणाखाली योग दिनाचा सोहळा यशस्वीपणे पार पडला. स्त्रीरोग विभाग प्रमुख मेनाओ के सह प्राध्यापक व शिक्षक वृंद उपस्थित होते. डॉ. गुणवंतराव आयुर्वेद महाविद्यालय, डॉ. उल्हास पाटील कॉलेज ऑफ होमिओपॅथी महाविद्यालयातही योग दिन साजरा करण्यात आला.





# इंग्लिश मीडियम सीबीएसई स्कूल सावदा

**जळगाव** – गोदावरी फाउंडेशन संचलित डॉ. उल्हास पाटील इंग्लिश मीडियम सी बी एस ई. स्कूल सावदा येथेजागतिक योग दिवसाचे आयोजन करण्यात आले होते . या कार्यक्रमासाठी दिनांक २१ रोजी बुधवार या दिवशी शाळेमध्ये सावदा येथील प्रजापिता ईश्वरीय ब्रह्मकुमारी वैशाली दीदी ब्रह्मकुमार श्री विकास महाजन ब्रह्मकुमार श्री भूषण फेगडे हे उपस्थित झाले होते.

शाळेच्या प्राचार्या सौ. भारती महाजन यांनी वैशाली दीदींचे पुष्पगुच्छ शाल देऊन स्वागत केले. श्री विकास महाजन , भूषण फेगडे यांचे शब्द सुमनांनी स्वागत केले. शाळेच्या प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना योगाबद्दल आपले मनोगत व्यक्त केले.त्यानंतर ब्रह्मकुमार विकास महाजन यांनी राज योगा व त्यांचे जीवनातील महत्त्व व फायदे याविषयी अत्यंत महत्त्वाचे मार्गदर्शन केले . त्यानंतर ब्रह्मकुमारी वैशाली दिदि यांनी अध्यात्मिक ,शारीरिक ,मानसिक, सामाजिक हे राज योगाचे प्रकार सांगितले. मन स्वच्छ आणि सुंदर रहावे मनातील द्वेष दूर करण्यासाठी वाईट संगती पासून दूर राहण्यासाठी योगा करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. हे देखील सांगितले.

या कार्यक्रमासाठी शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी प्रात्यक्षिक करीत होते .त्यांना शाळेतील क्रीडा शिक्षक प्रात्यक्षिक करून दाखवत होते. अशा प्रकारे पूर्ण शाळेत योगमय वातावरण निर्माण झाले होते . शाळेतील शिक्षिका सौ . उषा तायडे यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले आभार क्रीडा शिक्षक अली सर यांनी मानले.



## सीबीएसई स्कुल भुसावळ

**भुसावळ** – डॉ. उल्हास पाटील इंग्लिश मिडीयम सीबीएसई स्कुल भुसावळ येथे आंतराष्ट्रीय योग दिन साजरा.योग ही भारताच्या प्राचीन परंपरेची अमूल्य देणगी आहे. हे मन आणि शरीराच्या ऐक्याला मूर्त रूप देते; विचार आणि कृती; संयम आणि पूर्तता; मनुष्य आणि निसर्ग यांच्यातील सुसंवाद; आरोग्य आणि कल्याणासाठी एक समग्र दृष्टीकोन. हे व्यायामाबद्दल नाही तर स्वतःशी, जगाशी आणि निसर्गाशी एकतेची भावना शोधण्यासाठी आहे असे प्रिन्सीपल अनघा पाटील यांनी सांगीतले. यावेळी विद्यार्थ्यांनी योग प्रात्यक्षिक सादर केले.



# गोदावरी इंग्लिश मीडियम सीबीएससी स्कूल जळगाव



**जळगाव** – भारतीय प्राचीन संस्कृती, परंपरा यांमध्ये योग, योगासने, योगसाधना यांना अनन्य साधारण महत्त्व आहे. अगदी प्राचीन काळापासून ऋषीमुनी, साधुसंत यांनी वेळोवेळी योगाचे महत्त्व, त्याचे फायदे आणि त्याची गरज पटवून दिलेली आहे.

आजच्या काळातील धकाधकीच्या जीवनात योगाच्या माध्यमातून आपण आपले शरीर तंदरुस्त ठेवण्यासाठी, शिवाय मनावरही चांगले संस्कार रुजवण्यासाठी, तन आणि मन यांचा एकत्रित व्यायाम म्हणजे योग, असे म्हणता येईल. भारतातील ही योग संस्कृती जागतिक पातळीवर बहुतांश देशांनी स्वीकारली असून, योगासनांचे लाभ मोठ्या प्रमाणावर अनुभवले आहेत. जगभरातील देशांनी केवळ योग स्वीकारला नाही, तर त्याचा प्रचार आणि प्रसारही केला.

गोदावरी इंग्लिश मीडियम स्कूल जळगाव मध्ये योगाचे महत्त्व पटवून देण्यासाठी सुहासिनी योग मुंबई येथून प्रवीण बंदकर , श्रुती शिंदे, गायत्री शेटे, प्रसाद महामुनकर, प्रणित शेट्टे या पूर्ण टीमला बोलवण्यात आले होते. त्यांनी योग कसा करावा, कोणती योगासने शरीराला आणि मनाला सशक्त व सक्षम ठेवू शकतात, यावर आपली मते मांडली आणि प्रात्यक्षिके करून दाखवली. या कार्यक्रमात स्कूलमधील सर्व शिक्षकांनी भाग घेतला.

# गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालयात योगासनांद्वारे योग दिवस साजरा




**जळगाव – जगभरात २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा केला जातो. गोदावरी फाऊंडेशन संचलित गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालयात २१ जून २०२३ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योग प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले होते. गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्रागंणात सकाळी ७ वाजता कार्यक्रमास सुरुवात झाली. याप्रसंगी गोदावरी अभियांत्रिकीचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील, योगशिक्षक कृष्णाजी खडसे, प्रा. महेश एन पाटील सर्व विभागप्रमुख व प्राध्यापक वर्ग तसेच महाविद्यालयाचे विद्यार्थी उपस्थीत होते.**

योग प्रात्याक्षिकासाठी गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्रा.महेश एन पाटील व कृष्णाजी खडसे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व विद्यार्थी व प्राध्यापकवृंद यांनी योग प्रात्याक्षिक केले. तत्पूर्वी कृष्णाजी खडसे यांनी योगाभ्यास, योगासने याबद्दल इत्यंभुत माहिती सर्वांना दिली. यात त्यांनी सूर्यनमस्काराचे फायदे व प्रात्यक्षिक करून दाखवले.

ताडासन, वृक्षासन, पादहस्तासन, बद्धकोणासन, व्रजासन, मंडुकासन तसेच प्राणायाममध्ये कपालभाती,अनुलोम विलोम, भ्रामरी हे आसन करुन घेतली. तसेच योगासने केल्याने होणारे फायदे यावर प्रकाश टाकला. यामध्ये आजच्या आधुनिक युगात व्यग्रतेमध्येही योगासने शरीर निरोगी ठेवण्यास मदत करते. सर्व शारीरिक व मानसिक आजारांना शरिरासोबत दुर ठेवण्यासोबतच योगाचा प्रत्येकाच्या जीवनावर सकारात्मक प्रभाव पडतो. रोज योगासने केल्याने शारीरिक आणि मानसिक उर्जेच्या विकासासोबतच तणाव आणि नैराश्यही कमी होते, असेही त्यांनी सांगितले.

सदर उपक्रमाबाबत गोदावरी फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. उल्हास पाटील व सदस्य डॉ. केतकी पाटील यांनी कौतुक केले.या उपक्रमात महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचार्यांसह सर्व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. डॉ. उल्हास पाटील सीबीएसई स्कुल सावदा, भुसावळ, डॉ. उल्हास पाटील कृषी अभियांत्रिकी,अन्न व तंत्रज्ञान, तसेच कृषि महाविद्यालय, डॉ.उल्हास पाटील विज्ञान, विधी, महाविद्यालय, डॉ वर्षा पाटील इन्स्टीटयुट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी, गोदावरी आय एम आर महाविद्यालय, गोदावरी इग्लिश मिडीयम स्कुल, हरीभाउ जावळे इन्स्टीटयुट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट, डॉ. वर्षा पाटील वुमेन्स कॉलेज ऑफ होम सायन्स येथेही साजरा करण्यात आला.

## संपादकीय...

# गणवेशाचा मुद्दा मार्गी

'एक राज्य, एक गणवेश'सारखा निर्णय घेण्याची राज्य सरकारची कृती शाळा व्यवस्थापन समितीच्या कामकाजातील हस्तक्षेप करणारी आहे. शिक्षण हक्क कायद्यानुसार (आरटीई) गणवेश ठरविण्याचा अधिकार शाळा समितीला आहे. त्यामुळे सरकार थेट 'आरटीई'ला वळसा घालण्याचा प्रयत्न होता. मे महिन्याच्या अखेरीस शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी असा निर्णय जाहीर केल्यानंतर त्याच्या बेकायदा स्वरूपापासून अंमलबजावणीपर्यंतचे अनेक मुद्दे उपस्थित करून विरोध होत होता. विशेषत: मुख्याध्यापकांच्या आणि शिक्षकांच्या संघटनांनी आक्रमक भूमिका घेतली होती. गणवेश निकृष्ट आले, ते विद्यार्थ्यांना सैल किंवा आखूड झाले तर काय करायचे असे प्रश्नही होते. या योजनेतून हितसंबंधी गैरप्रकारांनाही वाव मिळू शकला असता. विरोधी पक्षांनीही टीकास्त्र सोडले. गेल्या काही वर्षांपासून 'एक देश, एक परीक्षा', 'एक देश, एक कर' आदींसारख्या घोषणांची आणि कार्यक्रमांची चलती आहे. 'एक राज्य, एक गणवेश' हा निर्णयही अशा कार्यक्रमांमध्ये शोभणारा होता. असे विविध आक्षेप, विरोध आणि अंमलबजावणीतील व्यावहारिक अडचणी आदींमुळे राज्य सरकारने अखेर हा निर्णय फिरविला. हे योग्य झाले.

एकसमान गणवेशाचा निर्णय मागे घेण्यात आला असला, तरी 'स्काऊट आणि गाइड'साठीचा गणवेश कसा असावा, कोणत्या दिवशी हा गणवेश विद्यार्थ्यांनी परिधान करावा हेही सरकारने स्पष्ट केले आहे. ही बाबही 'आरटीई'चा भंग करणारीच ठरते. पुढील वर्षी एकसमान गणवेश असणार असल्याने स्थानिक स्तरावर कार्यवाही केली जाऊ नये, असे नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे असा निर्णय देण्याबाबत सरकारने फेरविचार करावा. एकसमान गणवेशाला घेतलेले आक्षेप केवळ या वर्षापुरते मर्यादित नव्हते. त्यामुळे पुढील वर्षी तरी त्याची अंमलबजावणी का होणार, असा प्रश्न पडतो. याबाबत सरकारकडून स्पष्ट सूचना आल्यानंतर त्याबद्दल भाष्य करणे इष्ट ठरेल. केंद्र सरकारच्या 'समग्र शिक्षा अभियाना'च्या अंतर्गत सरकारी शाळांतील पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना गणवेश मोफत पुरविले जातात. सर्व मुली आणि अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, तसेच गरिबीच्या रेषेखालील मुलगे यांना गणवेश दिला जातो. राज्य सरकारने या वर्षी या योजनेची व्याप्ती वाढविली असल्याने आता गरिबी रेषेवरील विद्यार्थ्यांनाही मोफत गणवेश मिळेल. एकसमान गणवेशाचा निर्णय मागे घेतल्यामुळे आता दोन्ही गणवेश शाळा व्यवस्थापन समितीकडून ठरविले जातील. त्यासाठी राज्य सरकारकडून एका विद्यार्थ्यामागे एका गणवेशासाठी तीनशे रुपये दिले जातील. ही रक्कम लाभार्थ्यांच्या खात्यात थेट जमा केली जाईल. यामुळे यंदापु०रता गणवेशाचा मुद्दा मार्गी लागेल.

# यंत्र पद्धतीने किंवा बांधबंदिस्ती करून करता येणारे मृदा संवर्धन

(उत्तरार्थ)

### ढाळाचे बांध

जमीन सुपीक नसल्यास त्या जमिनीमधून पाण्याचा निचरा योग्य प्रमाणात होत नाही, त्याचप्रमाणे पावसाची तीव्रता जास्त असल्यास जमिनीची धूप होते. म्हणून अशा ठिकाणी किंचित उताराचे बांध टाकतात. अशा बांधामुळे माती वाहून न जाता जास्त पाणी बाहेर काढले जाते. बांधाच्या बाजूने त्याचा आडवा उतार ०.२ % ठेवला जातो व दोन बांधातील अंतर उताराच्या ५० ते १०० मीटर पर्यंत ठेवला जातो. या बांधावर नांगरणी न करता इतर मशागत शकतो.

हे बांध कमी पावसाच्या भागात घातले जातात तसेच हे बांध उथळ जमिनीवर घातले जातात. सुमारे १ ते ४ % उतारावर हे बांध घातले जातात. त्यामुळे जमिनीवर पडणारे पाणी हे चांगले मुरते व त्याचे मोठ्या प्रमाणात पाणी जिरते म्हणून जमिनीवरून वाहणाऱ्या पाण्याचा वेग हा कमी होतो. त्याचप्रमाणे माती वाहून जाण्याचा वेग सुद्धा कमी होतो. जमिनीच्या उतारावरील



शेत बांधाची उंची ही ७५ ते ९० सेंटिमीटर पर्यंत असते. या बांधावर सुद्धा नांगरणी शिवाय इतर मशागत करता येते.

### नाला बांधबंदिस्ती

जो प्रदेश पावसाळी असतो त्या मध्ये भरपूर नाले असतात आणि ते नाले पावसाळ्यातच वाहतात. पाणी वाहतांना नाल्यांच्या काठांची धूप होते. त्यांची धूप थांबवण्यासाठी लहान लहान नाले ठिकठिकाणी अडवून लहान तळे निर्माण करतात. त्यामुळे नाल्याच्या किनाऱ्याची होणारी धूप थांबवता येते आणि त्या नाल्याच्या प्रवाहाची गती सुद्धा मंदावते आणि त्या नाल्याच्या आजू बाजूची जमीन सुद्धा ओलिताखाली आणता येते.

### नद्या-नाले यांच्यामुळे होणाऱ्या धुपीचे नियंत्रण

नद्या व नाले यांच्यामुळे होणारी काठाची धूप रोखण्यासाठी नद्या व नाल्यांच्या दोन्ही बाजूस झाडांची लागवड केली जाते.



त्याचप्रमाणे काठांवर गवताची सुद्धा लागवड केली जाते. प्रवाहात अडथळे निर्माण केल्यास धुपीचे नियंत्रण केले जाऊ शकते.

### मृदा सर्वांधनामुळे होणारे फायदे:

✼ दीर्घकाळापर्यंत पिकाची गुणवत्ता व प्रमाणात वाढ होते.
✼ जमिनीची पाणी धरून ठेवण्याची क्षमता वाढते.
✼ नैसर्गिक संसाधने आणि पाणलोटाचे संरक्षण करण्यास मदत करते.
✼ पाण्याची गुणवत्ता सुधारते आणि पाण्याच्या पातळीत वाढ होते.
✼ वनस्पती पाणी वन्यजीवांसाठी आदिवास पुनर्संचयित करते.
✼ माती निरोगी बनवते.
✼ बांधबंदिस्ती केल्यास जवळील शेतजमिनी ह्या सिंचनाखाली येतात.

(संपूर्ण)




**डॉ. पुनमचंद रुपचंद सपकाळे**
(प्राचार्य)



**प्रा. संदिप पुरुषोत्तम पाऊलझगडे**
(सहाय्यक प्राध्यापक) मृदा व जलसंधारण अभि.विभाग

**डॉ. उल्हास पाटील कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, जळगाव**


## प्राचीन खान्देश-१

## खानदेशातील अश्मयुगीन स्थळे

# महाराष्ट्र आणि खानदेश

### प्रकरण ३ : विकास आणि नैसर्गिक स्थान

### अजिंठा लेणी

**बोधिसत्वाची रंगवलेली चित्रे**

नागपूजा करणारे जे इथले आदिवासी लोक ज्यांनी बौद्ध धर्म स्वीकारला त्यांनी बुद्ध धर्मात नागपूजासुद्धा आणली. बोधिसत्वाला नागराजाचे रूप देऊन त्यांनी आपली प्रार्थना सुरु केली. नागरूपातील बोधिसत्व अनेक ठिकाणी दिसतो. त्यातलेच हे एक शिल्प येथील चैत्यगृहाबागेरील डावीकडच्या भिंतीवर कोरलेले आहे. येथे मानव मुखधारी नागराज सात फड्यांचा नागमुकूट परिधान करून आपल्या राणीसह बसला आहे. बाजूला एक सेविका चवरी ढाळत उभी आहे.

ह्या चैत्यगृहानंतरचे काही विहार पूर्ण तर काही अपूर्णावस्थेत आहेत. ओसरीतले स्तंभ, सभामंडप, आतील स्तंभ, विश्रांतीकक्ष आणि गर्भगृहात बुद्धमूर्ती अशी आधीच्या विहारांसारखीच त्यांची रचना.

**लेणी क्र. २०**




मधल्या ओसरीतील शिल्पांकित स्तंभांवर स्तंभांवरील यक्षी, वृक्षी विहार करताना दाखवलेल्या आहेत. त्यांच्या मस्तकांवर वृक्ष



दाखवले आहेत.

लेणी नंबर वीस हा विहार आहे. जो पाचव्या शतकातील आहे साधारणपणे ४६० मधील राजा उपेंद्रगुप्त याने आपली इच्छा धर्माचा महान वृक्ष वाढवण्याची या तून निर्माण झाली आहे. इतर लेणी सोबतच हीचे पण काम सुरू झाले असावे. अतिशय बारकावे असलेल्या लेणीचे काम मध्येच बंद पडले आणि परत सुरू झाले असे दिसते.

चार विहार, स्तंभयुक्त व्हरांडा, दोन झरोके, छतावर चित्र अशी रचना आहे. गर्भगृहात बुध्द प्रवचनमुद्रेत आहे आणि द्वारखाशेवर सात बुद्ध भक्तांबरोबर कोरलेली आहेत. लेणीत व्हरांड्यात ब्राम्ही लिपीत आणि संस्कृत भाषेतील शिलालेख आहे ज्यात लेणीचा उल्लेख ममंडपफ असा केलेला आहे. चित्र आणि शिल्प लेणी नंबर १९ सारखीच आहे. सतरा, १९ आणि वीस तिन्ही एकाचवेळी सारख्याच किंवा त्याच कारागिरांच्या हातून कोरलेली आहेत. द्वारशाखा आणि आम्रवृक्षाखाली बसलेली बुद्ध मुर्ती ही दोन शिल्पविशेष आहे. यावर अजुन काही तज्ञांचे संशोधन सुरू आहे.

एक विशेष बाब बदल येथे दिसतो तो म्हणजे द्वारशाखेवर आता द्वारपाल कोरलेले आहेत जिथे पुर्वी जलकुंभ घेतलेल्या यक्षी किंवा गंगायमुना कोरलेल्या असायच्या. यापुढील सर्व लेणीत हा महत्त्वाचा बदल दिसून येतो.

(क्रमशः)




**सौ. सरला भिरुड**
संशोधक व लेखिका


# फास्ट फूड चेन्सचा उदय

फास्ट फूड चेन आधुनिक समाजाचा अविभाज्य भाग बनल्या आहेत, जे सुविधा, द्रुत सेवा आणि विविध प्रकारचे स्वादिष्ट खाद्य पर्याय देतात. या आस्थापनांनी स्वयंपाकासंबंधीच्या लँडस्केपमध्ये क्रांती घडवून आणली आहे, आपल्या खाण्याच्या सवयींना आकार दिला आहे आणि स्वतःच सांस्कृतिक चिन्ह बनले आहे. या लेखात, आम्ही फास्ट फूड चेनची घटना, त्यांचा इतिहास, प्रभाव आणि त्यांच्या व्यापक लोकप्रियतेमागील कारणे शोधू.

फास्ट फूड साखळी २० व्या शतकाच्या सुरुवातीस त्यांचा उगम शोधून काढतात जेव्हा द्रुत-सेवा रेस्टॉरंटची संकल्पना वाढू लागली. रे क्रोक (मॅकडोनाल्ड्स), हार्लंड सँडर्स (केएफसी) आणि रिचर्ड आणि मॉरिस मॅकडोनाल्ड (मॅकडोनाल्ड्स) सारख्या उद्योजकांच्या अग्रगण्य प्रयत्नांनी एक न थांबता येणारा ट्रेंड बनण्याचा पाया घातला. या द्रष्ट्यांनी प्रक्रिया सुव्यवस्थित करणे, मेनू आयटमचे मानकीकरण करणे आणि भुकेल्या ग्राहकांपर्यंत जलद अन्न पोहोचवण्यासाठी कार्यक्षम प्रणाली लागू करण्यावर लक्ष केंद्रित केले.

फास्ट फूड चेनच्या यशाचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे सोयी आणि वेगावर भर देणे. आजच्या वेगवान जगात, लोक सतत जलद उपाय शोधत असतात आणि फास्ट फूड चेन ही गरज पूर्ण करतात. ड्राइव्ह-थ्रू विंडो, ऑनलाइन ऑर्डरिंग आणि मोबाइल ॲप्ससह, ग्राहक वेळ न घालवता त्यांची इच्छा पूर्ण करू शकतात. जाता जाता जेवण मिळवण्याच्या क्षमतेने व्यस्त व्यक्ती आणि कुटुंबांसाठी फास्ट फूड चेनला लोकप्रिय पर्याय बनवले आहे. फास्ट फूड चेन त्यांच्या वैविध्यपूर्ण मेनू ऑफरसाठी ओळखल्या जातात ज्या विविध प्रकारच्या चव आणि प्राधान्ये पूर्ण करतात. क्लासिक बर्गर आणि फ्राईंपासून ते आंतरराष्ट्रीय पाककृती, सॅलड्स, रॅप्स आणि शाकाहारी पर्यायांपर्यंत, या आस्थापने प्रत्येकासाठी काहीतरी प्रदान करण्यासाठी विकसित झाल्या आहेत. शिवाय, पौष्टिक पर्यायांच्या वाढत्या मागणीला प्रतिसाद देत अनेक फास्ट फूड




साखळींनी आरोग्यदायी पर्याय सादर केले आहेत.

फास्ट फूड चेनने राष्ट्रीय सीमा ओलांडल्या आहेत आणि त्यांचा प्रभाव जगभरात पसरवला आहे. उदाहरणार्थ, मॅकडोनाल्ड हे अमेरिकन संस्कृतीचे समानार्थी बनले आहे आणि विविध देशांतील स्थानिक अभिरुचीनुसार त्याच्या ऑफरचे यशस्वीपणे रुपांतर केले आहे. या जागतिकीकरणाने एक सांस्कृतिक देवाणघेवाण निर्माण केली आहे, ज्यामुळे लोकांना नवीन चव आणि स्वयंपाकासंबंधी अनुभवांची ओळख होते. फास्ट फूड चेन अमेरिकन जीवनशैलीचे प्रतिकात्मक प्रतीक बनल्या आहेत आणि लोकांच्या जेवणाच्या आणि सामाजिकतेला आकार दिला आहे.

फास्ट फूड चेनच्या जलद वाढीमुळे रोजगार निर्मिती आणि आर्थिक विकासात महत्त्वपूर्ण योगदान आहे. जगभरातील लाखो लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणार्या या आस्थापनांना मोठ्या प्रमाणावर कामगारांची आवश्यकता असते. याव्यतिरिक्त, फास्ट फूड चेन महसूल उत्पन्न करतात, कर भरतात आणि फ्रँचायझी फी, भाडे करार आणि पुरवठा साखळी भागीदारीद्वारे स्थानिक अर्थव्यवस्थांमध्ये योगदान देतात. त्यांचा आर्थिक प्रभाव त्यांच्या तात्काळ स्थानांच्या पलीकडे पसरतो, ज्यामुळे समुदायांना व्यापक प्रमाणात फायदा होतो.

फास्ट फूड चेन त्यांच्या टीका आणि आव्हानांशिवाय राहिलेल्या नाहीत. आरोग्यावरील परिणाम, पर्यावरणीय स्थिरता आणि श्रम पद्धतींबद्दलच्या चिंतेने उद्योगात अधिक पारदर्शकता आणि जबाबदारीची मागणी केली आहे. प्रतिसादात, अनेक साखळींनी त्यांच्या सोर्सिंग पद्धती सुधारण्यासाठी, पोषणविषयक माहिती प्रदान करण्यासाठी आणि पर्यावरणास अनुकूल उपक्रम स्वीकारण्यासाठी पावले उचलली आहेत.

पुढे पाहता, ग्राहकांच्या पसंती बदलून आणि सामाजिक अपेक्षा विकसित करून फास्ट फूड चेनचे भविष्य घडण्याची शक्यता आहे. आरोग्यदायी, अधिक शाश्वत पर्यायांची मागणी वाढत आहे आणि फास्ट फूड साखळींना या गरजा पूर्ण करण्यासाठी त्यांच्या सोयी आणि परवडणारी मूलभूत शक्ती कायम ठेवण्यासाठी अनुकूल आणि नवनवीन गोष्टींची आवश्यकता असेल.


**रोहित अग्रवाल,**
सहा.प्राध्यापक,
हरीभाऊ जावळे इन्स्टीट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट केटरिंग टेक्नॉलॉजी

## संत तुकाराम सार्थ गाथा



### अभंग क्र. ६१

भोरप्यानें सोंग पालटिलें वरी ।
बक ध्यान धरी मत्स्या जैसें ।।१।।
टिळे माळा मैंद मुद्रा लावी अंगीं ।
देखों नेदि जगीं फांसे जैसे ।।ध्रु.।।
ढीवर या मत्स्या चारा घाली जैसा ।
भीतरील फांसा कळों नेदी ।।२।।
खाटिक हा स्नेहवादें पशु पाळी ।
कापावया नळी तया साठीं ।।३।।
तुका म्हणे तैसा भला मी लोकांत ।
परी तूं कृपावंत पांडुरंगा ।।४।।

**अर्थ –**

बहुरूपी वरवर विविध सोंग घेऊन दखवितो अथवा बगळा मासा पकडण्यासाठी डोळे बंद असल्याचे सोंग करतो .त्या प्रमाणे भक्तीचे ढोंग करणारा टिळा, माळ, मुद्रा लाऊन जगाला फसवित असतो .कोळी मासे पकडण्याआधी गळाला खाद्य लावतो, त्या खादयामधील फासा माश्याला समजून येत नाही .खाटिक बकर्याला कापण्याआधी प्रेमाने पाळत असतो .तुकाराम महाराज म्हणतात, हे देवा, तू माझा अव्हेर करू नको; कारण तू दयाळू, प्रेमळ असा तारणहार आहेस .

## सुविचार

अडचणीच्यावेळी सगळ्यात मोठा आधार म्हणजे स्व:तावरचा विश्वास. जो मंद हास्य करत तुमचा कानात सांगतो की, सगळं व्यवस्थित होईल.

## सप्ताहातील दिनविशेष

दि. २९ – देवशयनी आषाढी एकादशी.
दि. २९ – बकरी ईद



## देवस्थान :- अंजनी माता मंदिर (अंजनेरी किल्ला)

अंजनेरी किल्ला हा नाशिक – त्र्यंबकेश्वर रांगेतील महत्त्वाचा किल्ला आहे. या पर्वतावर अंजनी मातेने १०८ वर्षे तप केले आणि वायुपुत्र हनुमानाचा जन्म याच डोंगरावर झाल्याची लोकांची श्रध्दा आहे. या कारणास्तव या किल्ल्याला अंजनेरी नाव देण्यात आले. याच डोंगराच्या परिसरात हनुमान लहानाचे मोठे झाल्याचे समजले जाते. अंजनेरी फाट्यावर जवळचं गावातील हनूमान मंदिर आहे.

किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या अंजनेरी गावात १६ पूरातन मंदिरे आणि शिलालेख पाहाता येतात. यातील ४ मंदिरे हिंदु देवतांची असून १२ मंदिरे जैन देवतांची आहेत. येथे १०८ जैन लेणी आहेत.

अंजनेरी गावातून पायऱ्यांच्या वाटेने गडावर जाता येते. वाटेतच जैनधर्मीय लेण्या दिसून येतात. पठारावर पोहोचल्यावर अंजनी मातेचे मंदिर आहे. अंजनी देवीच्या मंदिरासमोर एक तलाव दिसते. तलावाला हनुमान तलाव आणि इंद्र कुंड या नावाने ओळखले जाते. हनुमानाने या ठिकाणी पाऊल ठेवले होते त्यामुळे तलावाचा आकार पाऊलाप्रमाणे आहे अशी लोकांची श्रध्दा आहे. दंतकथेप्रमाणे हनुमानजी लहान असताना जेव्हा सूर्याला फळ समजून खायला निघाले तेव्हा त्यांनी डाव्या पायाने उंच उडी घेतल्यामुळे हा तलाव निर्माण झाला आहे. बारकाईने तलावाकडे पाहिल्यावर समजते की डाव्या पायाचे निशाण आणि त्याची बोटं सूर्याच्या दिशेने आहे.

समोर गेल्यावर अंजनी मातेची गुफा लागते. असे म्हटले जाते की अंजनी मातेने शिवाकडे पुत्र व्हावे म्हणून तपश्चर्या केली व त्यानंतर हनुमानाचा जन्म झाला. येथे अंजनी मातेच्या कुशीत असलेल्या हनुमानजींची अशी एकमेव मूर्ती आहे. पठारावर एक तलाव असून येथून वेतरणा, गंगापूर, मुकणे, दारणा, कश्यपी व गौतमी-गोदावरी धरणाचा विस्तार पाहता येतो.



**कसे पोहचावे** - ❊ १२ ज्योतिर्लिंगा पैकी एक त्र्यंबकेश्वर तिर्थक्षेत्राहून अंजनेरी किल्ला ३ किलोमीटर अंतरावर आहे. अंजनेरी गावातून बालेकिल्ल्यावर जाण्यासाठी सुमारे दोन तास लागतात.

## पाककृती

### पोहे पकोडा



**साहित्य –** पोहे, उकडलेले बटाटे, मटार, दही, आले, लसूण, काही मसाले

**कृती –** सर्वप्रथम एका खोलगट तळाच्या कढईत पाणी आणि हिरवे वाटाणे घेऊन उकळावे आता आले सोलून त्याचे तुकडे करून आले आणि हिरव्या मिरचीची पेस्ट बनवा. हिरव्या मिरच्याही तळून घ्या आणि दोन्ही मिक्सरमध्ये बारीक करा. एक वाडगा घ्या. आता उकडलेले बटाटे सोलून हाताने मॅश करा. त्यात हिरवे वाटाणे, पोहे आणि आले आणि हिरव्या मिरचीची पेस्ट घाला. आता त्यात दही घाला. आता त्यात हळद, लाल तिखट, गरम मसाला पावडर आणि धणे पावडर असे मसाले घाला. तसेच चवीनुसार मीठ घालावे. सर्व साहित्य चांगले मिसळा. ताजी चिरलेली कोथिंबीर



घालून नीट मिसळा. आता या मिश्रणाचे छोटे-छोटे भाग करून त्याचे छोटे गोल गोळे बनवा. ते खोल तळण्यासाठी, तळण्याचे पॅनमध्ये तेल गरम करा. तेल गरम झाल्यावर त्यात पोहे बटाट्याचे गोळे टाकून सोनेरी होईपर्यंत तळून घ्या. चटणीसोबत गरमागरम सर्व्ह करा.

## नियमांचे पालन केल्यास अपघात कमी होतील : पोउनि सोनवणे



**जळगाव** – रस्ता सुरक्षा नियम पाळा, आणि अपघात टाळा,नियमांचे पालन केल्यास अपघाताच्या संख्येत घट होवू शकते. रस्ता सुरक्षेच्या दृष्टीने महत्वाचे नियम जाणून घ्या. तुमचे आणि रस्त्यावरील इतर ड्रायव्हर्सचे संरक्षण करण्यासाठी रहदारीचे नियम तयार केले आहेत. प्रत्येक देशाचे सरकार काही नियम आणि कायदे आखते आणि ते त्या देशातील लोकांना लागू करते. देशाच्या उत्तम वाहतूक व्यवस्थेसाठी बनवले जाणारे वाहतूक नियम विषयी प्रत्येकास माहित असावेत.असे प्रतिपादन महामार्ग वाहतूक शाखा जळगाव पो.उ.नि. राजेंद्र सोनवणे यांनी केले.

डॉ. उल्हास पाटील वैद्यकिय महाविद्यालय व धर्मदाय रूग्णालयात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी अधिष्टाता डॉ. एन एस आर्विकर, प्रशासन अधिकारी प्रमोद भिरूड,पॅथालॉजी विभागाचे डॉ. नितीन भारंबे, औषधशास्त्र विभागाचे डॉ. बापुराव बिटे, इ मान्यवर उपस्थीत होते. पुढे बोलतांना रस्त्यांचे रहदारीचे नियम हे दोन्ही कायदे आणि अनौपचारिक नियम आहेत; जे वाहतुकीचा सुव्यवस्थित आणि वेळेवर प्रवास सुलभ करण्यासाठी केले आहेत. हे नियम पाळले तर, ९९% रस्ते अपघात संपतील. रस्ता सुरक्षेच्या नियमांची माहिती नसणे, निष्काळजीपणा ही या परिस्थितीमागची प्रमुख कारणे आहेत. म्हणून प्रत्येकाने नियम माहित करून घ्यावेत असे आवाहन त्यांनी केले. यावेळी त्यांचे सोबत हवालदार संजय यादे, हवालदार विशाल चव्हाण, पोलीस नाईक गिरीश शिंदे, पोलीस शिपाई सतीश बाविस्कर हे उपस्थीत होते.

## शैक्षणिक विकासासाठी धोरणांमध्ये आमुलाग्र बदल करावे लागतील : डॉ.सुनील पाटील

**जळगाव –** अमेरिकेची शिक्षण पध्दती आज जागतिक स्तरावर गाजलेली असून बेल लॅबोरेटरीचे योगदान मोठे असून भारतातील शैक्षणिक विकासासाठी धोरणामध्ये आमुलाग्र बदल करण्याची गरज असल्याचे मत बेल लॅब अमेरिका येथील शास्त्रज्ञ डॉ. सुनील पाटील यांनी काल गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालय येथे केले.

अमेरिकेतील बेल लॅबमध्ये नऊ नोबेल पारितोषिक विजेते संशोधक यात ट्रांजिस्टर, लेझर, चार्ज कपल डिव्हाइस आणि फोटो व्होलेटीक सेल याच्या सोबत काम केलेल्या कालावधीत माहिती सिद्धांत, युनिक्स ऑपरेटिंग सिस्टीम आणि सी प्रोग्रामिंग भाषा यांचा उगम झाला आहे. ही लॅब नॅशनल ट्रेझर म्हणून ओळखली जाते. इनोवेशन आणि अकॅडमीक रिसर्च व टिचिंग या सर्वांची सांगड घालत संशोधन कसे करायचे याबद्दल सांगितले. या सर्व गोष्टी करण्यासाठी आपल्या आसपासचे वातावरण पोषक असणे गरजेचे आहे. आपण इनोवेशन संदर्भात फोकस असणे आवश्यक आहे. भारत देशामध्ये इतर देशांच्या मानाने इनोवेशन व पेटंट याबद्दल कमी जागरूकता आहे. तसेच रिसर्च पेपर हे चांगल्या रिसर्च जर्नल मध्ये पब्लिश होणे आवश्यक आहे जेणेकरून इनोव्हेशनला चालना मिळेल. इंटेलेक्चुअल प्रॉपर्टी बद्दल सांगताना जागरुक होऊन काम करणे गरजेचे आहे.

एखादी आयडिया सुद्धा पटेंट होऊ शकते, परंतु त्या दृष्टीने काम करणे गरजेचे



असते हे त्यांनी काही उदाहरणांचे दाखले देत स्पष्ट केले. तसेच त्यांनी विविध बौद्धिक संपदा हक्क, सद्य परिस्थितीमध्ये इंटर डिसीप्लीनिअरी कोलॅब्रेशनची आवश्यकता आहे. अकॅडमीकच्या वेगवेगळ्या शाखांशी होणे गरजेचे आहे. तसेच शिकवणे ही सेवा आहे नोकरी नाही. असेही त्यांनी नमूद केले. त्यांनी नवीन शैक्षणिक धोरणाबद्दल माहिती देताना सांगितले की, आपल्या देशाला ही सिस्टीम पूर्णपणे राबवायला अजून बरेच वर्षे लागतील. कारण प्रत्येक व्यक्तीने त्या दृष्टीने आपले पाऊल उचलणे गरजेचे आहे. आज बऱ्याच खेड्या गावांमध्ये पायाभूत सुविधा उपलब्ध नाही. अशा बऱ्याचशा वेगवेगळ्या गोष्टींवर त्यांनी सर्व प्राध्यापकांशी चर्चा केली. त्याचप्रमाणे त्यांना विचारलेल्या प्रश्नांची त्यांनी समर्पक उत्तरे दिली. गोदावरी फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ.उल्हास पाटील सर व सदस्य डॉ. केतकी पाटील मॅडम यांनी कार्यक्रमाच्या आयोजनाबद्दल कौतुक केले.

सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ. विजयकुमार वानखेडे यांनी केले. या प्रसंगी गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील तसेच डॉ. विजयकुमार वानखेडे (ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर), यंत्र विभाग प्रमुख प्रा.तुषार कोळी तसेच सर्व प्राध्यापक वर्ग उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विजयकुमार पाटील यांनी डॉ. सुनिल पाटील यांचे शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

डॉ. सुनील पाटील यांनी २२ वर्षे अमेरिकेमध्ये काम केले आहे. त्यानंतर ते पुणे येथील सिम्बॉयसिस युनिव्हर्सिटी मध्ये दहा वर्षे कार्यरत होते.

त्यांनी जगभरामध्ये तसेच भारतामध्ये एज्युकेशन सिस्टीम या विषयावर सखोल असे काम केले आहे व त्याद्वारे सर्वांना मार्गदर्शन करीत आहे. तसेच त्यांनी एम्पॉवरिंग ऑफ फॅकल्टी इन इंजिनिअरींग एज्युकेशन या विषयावर पुस्तकाचे लिखाण केले आहे.



# विकारमुक्त होण्यासाठी डॉक्टरांना भेटा..!

## डॉ.उल्हास पाटील धर्मार्थ रुग्णालयात तज्ज्ञांच्या सेवा दररोज उपलब्ध

जळगाव - मधुमेह, रक्तदाब, किडनीविकार, श्वसनविकार, पोटदुखी, ॲसिडीटी, पक्षाघात अशा कुठल्याही स्वरुपाच्या गंभीर, अतिगंभीर आजाराने जर तुम्ही त्रस्त होत असाल तर डॉ.उल्हास पाटील धर्मार्थ रुग्णालय तुमच्यासाठी घेऊन आले आहे तज्ञ डॉक्टरांच्या दररोज सेवा.. विकारमुक्त होण्यासाठी आजच डॉक्टरांना भेटा.. येथे डॉक्टरांद्वारे तपासणी व सल्ला मोफत दिला जात असून ॲडमिटची गरज भासणार्‍या रुग्णांवर महात्मा ज्योतिबा फुले योजनेंतर्गत उपचार केले जातात. त्याकरीता रुग्णांनी सोबत येतांना आधार कार्ड व रेशन कार्ड घेऊन यावे असे आवाहन रुग्णालय प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

### पक्षाघातावर प्रभावी उपचार

मेंदूचे कार्य सुरळीत राहण्यासाठी मेंदूला रक्तपुरवठा होणे गरजेचे असते मात्र ज्यावेळी रक्तपुरवठा खंडीत होतो त्यावेळी व्यक्तीला पक्षाघाताचा अटॅक आल्याचे समजले जाते. पक्षाघात झाल्यावर सर्वप्रथम रुग्णाच्या एका बाजूच्या हाता-पायाची ताकद कमी होते, तोंड वाकडं होते, बोलतांना अडथळे येतात, अन्न गिळण्यास आणि श्वास घेण्यास त्रास होतो तसेच रुग्णाला चक्कर येतात, अशी लक्षणे जाणवल्यास त्वरीत वैद्यकीय उपचारासाठी रुग्णालयात दाखल व्हावे. येथे तज्ज्ञांद्वारे उपचार केले जातात.



**- डॉ. हर्ष त्रिपाठी**
८८८८५९३०४९

### खराब किडनीवर उपचाराद्वारे मात

किडनी शरीरातील पाणी, सोडियम, कॅल्शियम आणि पोटॅशियमची मात्रा तसेच आम्ल आणि क्षार नियंत्रित करते. एकूणच शरिरातील रक्त शुद्ध करण्याचे काम किडनी करते, मात्र काही कारणांमुळे किडनी खराब झाल्यास रुग्णाची भूक कमी होते, वारंवार लघवी लागते, लघवीत जळजळ होते, मळमळणे, उलट्या होतात तसेच चेहर्‍यावर सूज ययेते, रक्तदाब वाढते, एचबीचे प्रमाण कमी होते, असे विविध लक्षणे दिसून येतात, यापैकी कुठलेही लक्षणे दिसून येत असतील तर लगेचच फिजीशियनला भेटा, अशा खराब झालेल्या किडनीवर येथे प्रभावी उपचाराद्वारे मात केली जाते.



**- डॉ. मोहित वाघ**
८९८३७३९०८५

### दमा विकाराचे निदान व उपचार

श्वसनसनमार्गात अडथळा आल्यावर तो अरुंद होतो व त्यावर सूज येते, तसेच कफ देखील अधिक प्रमाणात होतो. परिणामी घशात घरघर आणि श्वास घेण्यास अडचण येते. अशावेळी रक्ताच्या तसेच एक्स रे द्वारे दमा झाल्याचे निदान केले जाते. दमा असलेल्या व्यक्तीला रात्रीच्या वेळी किंवा पहाटे खोकला अधिक प्रमाणात येतो, खोकून व्यक्ती बेजार हाते, जीव घुटमळल्यासारखे होते, बराच वेळ खोकल्यावर थोडा जरी कफ पडला तरी काही काळापुरते बरे वाटते. मात्र पुन्हा तीच परिस्थीती होते. रुग्णामध्ये अस्वस्थता वाढते, असा काही त्रास होत असल्यास रुग्णालयात येवून तपासणी, निदान व उपचार करुन घ्या.



**- डॉ.उमेश माधवराव**
९१७५५५५१३३

# आयएमए वैद्यकीय क्षेत्रातील तरूण डॉक्टरांच्या सदैव पाठीशी

## हेल्थकेअर कॉनक्लेव्हप्रसंगी आयएमए हेडक्कार्टरचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ.असोकन यांचे प्रतिपादन

**जळगाव -** देशात डॉक्टरांची कमतरता असल्याचा आभास निर्माण केला जात आहे. मात्र सद्यस्थितीला एक लाख डॉक्टर बेरोजगार आहेत. इंडियन मेडीकल असोसिएशन हे स्वयंरोजगाराचे केंद्र असून वैद्यकीय क्षेत्रातील तरूण डॉक्टराच्या प्रत्येक अडचणीत आयएमए त्यांच्या पाठीशी असल्याचे प्रतिपादन इंडियन मेडीकल असोसिएशन हेडक्कार्टरचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. आर. व्ही. असोकन यांनी आज येथे केले.



जळगाव इंडियन मेडीकल असोसिएशन आणि डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयातर्फे डॉ. केतकी हॉल येथे आयोजित हेल्थकेअर कॉनक्लेव्ह अर्थात राष्ट्रीय आरोग्य सेवा परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. असोकन बोलत होते. कार्यक्रमाच्या सुरूवातीला इंडियन मेडीकल असोसिएशन हेडक्कार्टरचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. आर. व्ही. असोकन यांचे डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व आयएमएतर्फे ढोलताशांच्या गजरात आणि लेझीमच्या तालात स्वागत करण्यात आले. तसेच डॉ. असोकन यांचा आज ६८ वा वाढदिवस असल्याने त्यांच्या हस्ते महाविद्यालयाच्या आवारात वृक्षारोपण करण्यात आले. त्यानंतर डॉ. केतकी हॉल येथे डॉ. आर.व्ही. असोकन यांचे आगमन झाले. मुळचे केरळ येथील असलेले डॉ. असोकन यांचे वारकरी संप्रदायाची प्रचिती देणारे कानडा राजा पंढरीचा या भक्तीगीताने स्वागत करण्यात आले. तसेच सृष्टी सोनपसारे या विद्यार्थीनीने भरतनाट्यम करीत गणेशवंदना सादर केली. याप्रसंगी इंडियन मेडीकल असोसिएशन हेडक्कार्टरचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. आर. व्ही. असोकन यांच्या हस्ते धन्वंतरी पूजन आणि दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर जळगाव आयएमएचे अध्यक्ष डॉ. सुनील नाहाटा, गोदावरी फाऊंडेशनचे अध्यक्ष तथा माजी खासदार डॉ.उल्हास पाटील, आयएमए सचिव डॉ. तुषार बेंडाळे, जळगाव आयएमएचे आयोजन समितीचे अध्यक्ष डॉ. अनिल पाटील, आयएमए हेड क्वॉटरचे उपाध्यक्ष डॉ. जयेश लेले, आयएमए हेड क्वॉटरचे उपाध्यक्ष डॉ. शिवकुमार उत्तुरे, माजी अध्यक्ष डॉ. रवी वानखेडकर, आयएमएचे राष्ट्रीय उपाध्यक्ष डॉ. अनिल पाचणेकर, महाराष्ट्र आयएमचे अध्यक्ष रवींद्र कुटे, आयएमए महाराष्ट्र सचिव डॉ. संतोष कदम, डॉ. मंगेश पाटे, डॉ. सत्येन मंत्री, डॉ. संतोष कुळकर्णी, महाराष्ट्र आयएमए (इले)अध्यक्ष डॉ. दिनेश ठाकरे, आयएमए एमएसएन महाराष्ट्रचे डॉ. अजय साहा, आयएमए एमएसएल महाराष्ट्र चेअरमन डॉ. शिव जोशी, डॉ. वसंत लुंजे, नाशिक आयएमएच्या अध्यक्षा डॉ. स्वप्नांजली कदम, वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.एन.एस. आर्विकर, गोदावरी फाऊंडेशनच्या सचिव डॉ. वर्षा पाटील, गोदावरी फाऊंडेशनच्या सदस्या डॉ. केतकी पाटील, डॉ. वैभव पाटील, डॉ.सुहास बोरले, डॉ.सुहास पिंगळे, आयएमएचे माजी अध्यक्ष डॉ. लोंढे, डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयाचे रजिस्ट्रार प्रमोद भिरुड, सूक्ष्मजीवशास्त्र विभाग प्रमुख डॉ. कैलास वाघ, पीएसएम विभाग प्रमुख डॉ.दिलीप ढेकळे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरूवातीला आयोजन समितीचे सहसमन्वयक डॉ. भरत बोरोले यांनी आयएमएच्या प्रतिज्ञेचे वाचन केले.

### तरूण डॉक्टर वैद्यकीय क्षेत्राचे उज्वल भविष्य - डॉ. असोकन

इंडियन मेडीकल असोसिएशन हेडक्कार्टरचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. आर. व्ही. असोकन यांनी वैद्यकीय क्षेत्रातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना सांगितले की, डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयाचा भव्य परिसर आणि डॉ. उल्हास पाटील यांचा अत्यंत साधेपणा यामुळे मी भारावलो आहे. डॉ. उल्हास पाटील हे वैद्यकीय क्षेत्रासाठी एक रोल मॉडेल असल्याचे गौरवोद्गार डॉ. असोकन यांनी व्यक्त केले. ते पुढे म्हणाले की, वैद्यकीय क्षेत्रात सरकारकडून जे काही धोरण ठरविले जाते त्यात अनेक विषयांवर सरकारशी चर्चा करण्यात आली आहे. वैद्यकीय शिक्षण पूर्ण झालेल्या तरूण डॉक्टरांसाठी त्यांचा सहकारी हाच त्यांचा भाऊ,बहिण असल्याचे कायम लक्षात ठेवावे. प्रत्येक अडचणीत हाच सहकारी तुम्हाला मदत करणारा आहे. वैद्यकीय क्षेत्रात राष्ट्रीय स्तरावर अनेक संधी उपलब्ध आहेत. देशात एक लाख डॉक्टर जॉबच्या प्रतिक्षेत आहेत. इंडियन मेडीकल असोसिएशन हे स्वयंरोजगार केंद्राचे काम करीत असल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ. असोकन यांनी पदानुक्रम आणि वर्चस्व, उद्यमशीलता, वैद्यकीय क्षेत्रातील वारसा, कामाच्या ठिकाणी होणारी हिंसा, वैद्यकीय विद्यार्थी आणि तरूण डॉक्टरांसमोरील आव्हाने यावर मार्गदर्शन केले.तसेच तरूण डॉक्टर्स हे देशाचे उज्वल भविष्य आहे. तुमचे पालक म्हणून आयएमए सदैव तुमच्या पाठीशी असल्याचेही डॉ. असोकन यांनी यावेळी स्पष्ट केले.

याप्रसंगी माजी खा. डॉ. उल्हास पाटील, डॉ. विलास भोळे, आणि विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्न आणि शंकाचेही डॉ. असोकन यांनी निरसन केले. याप्रसंगी डॉ. रवींद्र कुटे यांनीही डॉ. उल्हास पाटील यांच्याविषयी गौरवोद्गार काढले. यानंतर ज्युनिअर डॉक्टर्स नेटवर्क या विषयावर डॉ. जयेश लेले यांनी सादरीकरण केले. यावेळी डॉ. रामकृष्ण लोंढे, डॉ. दिनेश ठाकरे उपस्थित होते. द रोल ऑफ मेडिकल काऊंसिलिंग इन मेडिकल एज्युकेशन विषयावर डॉ.शिवकुमार उत्तुरे यांनी सादरीकरण केले यावेळी डॉ.सुहास पिंगळे, डॉ.अनिल पाचणेकर उपस्थीत होते. तसेच रिसायलेंस क्वॉलिटी टू ॲक्वायर अँज अ यंग डॉक्टर या विषयावर डॉ.शिव जोशी यांनी सादरीकरण केले. यावेळी डॉ.अजय साह, डॉ.मिलिंद नाईक उपस्थीत होते.

परिषदेच्या प्रास्ताविकातून वैद्यकीय महाविद्यालयाचे चेअरमन डॉ. उल्हास पाटील यांनी राष्ट्रीय आरोग्य सेवा परिषदेचा उद्देश स्पष्ट केला. परिषदेचे सूत्रसंचालन डॉ. रागीनी पाटील यांनी तर आभार आयएमए सचिव डॉ.तुषार बेंडाळे यांनी मानले.

### वुमन एम्पॉवरमेंट लेक्चर सिरीचे उद्घाटन

परिषदेच्या सुरुवातीला वुमन एम्पॉवरमेंय लेक्चर सिरीजच्या होर्डींगचे प्रकाशन डॉ.आर.व्ही.असोकन यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी आयएमए नाशिक अध्यक्ष डॉ. स्वप्नांजली कदम व डॉ.केतकी पाटील उपस्थीत होते. तसेच आयएमएच्या डिस्काउंटेड मेंबरशीप मोहीमेच्या पोस्टरचेही डॉ. असोकन यांच्यासह डॉ.शिव जोशी व मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

### डॉ.असोकन हे वैद्यकीय क्षेत्राची अमूल्य संपत्ती : डॉ.उल्हास पाटील

*परिषदेचे प्रास्ताविक करतांना वैद्यकीय महाविद्यालयाचे चेअरमन डॉ. उल्हास पाटील यांनी सांगितले की, इंडियन मेडीकल असोसिएशन हेडक्कार्टरचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. आर. व्ही. असोकन हे आयएमएची अमूल्य अशी संपत्ती आहे. देशातील वैद्यकीय क्षेत्राचे धोरण ठरविण्यात त्यांचा मोठा वाटा राहिला आहे. डॉ. असोकन यांच्या उपस्थितीत ही परिषद होत असल्याचा आम्हाला अभिमान असल्याचे डॉ. उल्हास पाटील यांनी सांगितले. तसेच ते पुढे म्हणाले की, जळगाव आयएमएच्या सामाजिक उपक्रमात नेहमीच उत्स्फुर्त सहभाग राहिला आहे. अडचणीच्या आणि कठीण प्रसंगात जळगाव आयएमए एकजुटीने एकमेकांसाठी उभे राहतात. जळगाव आयएमएमध्ये कधीही खुर्चीसाठी वाद झाले नाहीत ही अभिमानाची बाब असल्याचे डॉ. उल्हास पाटील यांनी सांगितले.*

Godavari Foundation's

# DR. ULHAS PATIL MEDICAL COLLEGE & HOSPITAL,

**Recognized by Medical Council of India, Approved by Central Govt. of India, New Delhi,**
**Letter no. MCI-34(41)/2012-med./158127, dated 05/02/2013**
**Affiliated to Maharashtra University of Health Sciences, Nashik [College Code-1306]**
**Jalgaon-Bhusawal Road, Jalgaon Kh, Tal. & Dist. Jalgaon 425309**
**Tel. No. (0257)2366657, 2366678 Fax No. 0257-2366648**
**Email ID : dupmcj@yahoo.in Web Site : www.dupmc.ac.in**

DR ULHAS PATIL MEDICAL COLLEGE & HOSPITAL- HealthCamp List July 2023

| Sr No. | Date | Place | Concerned People | PRO Name | Department |
|---|---|---|---|---|---|
| 01 | 01/07/2023 Saturday | Railgaon (Bhokardan)<br><br>Bharaj Bk (Jafrabad)<br><br>Malungi (Nandura) | Krushna Misal 9764116729<br><br>Pradip Fepale 9021577637<br><br>Rameshwar Dhivare 8551858558 | Kalpesh Ingale 9011911779<br><br><br><br>Vijay Rajput 9112801426 | All Department<br><br>Surgery, Medicine, Opthal<br><br>All Department |
| 02 | 02/07/2023 Sunday | **Off** | **Off** | **Off** | **Off** |
| 03 | 03/07/2023 Monday | Bhokar (Jalgaon)<br><br>Kosgaon (Bhokaradan) | Bhausaheb Sonawane 9561820859<br><br>Avchit Shinde 9049904927 | Makrand Mahajan 9765271188<br><br>Kalpesh Ingale 9011911779 | 2D Echo<br>All Department<br><br>All Department |
| 04 | 04/07/2023 Tuesday | Kulamkhed (Buldhana)<br><br>Malkapur<br><br>Sawangi (Bhokardan) | Kishor Raje 8378909017<br><br>Vilas Tayde 9890342572<br><br>Madan Shivankar 9421647353 | Vijay Rajput 9112801426<br><br>Vijay Rajput 9112801426<br><br>Kalpesh Ingale 9011911779 | All Department<br><br>All Department<br><br>All Department |
| 05 | 05/07/2023 Wednesday | Chinchkhed (Bodawad) | Pravin Barhate 7030806630 | Vijay Rajput 9112801426 | All Department |
| 06 | 06/07/2023 Thursday | | | | |
| 07 | 07/07/2023 Friday | Shelake Hospital (Mehakar) | Dr Gunvant Shelke 9975017731 | Makarand Mahajan 9765271188 | 2D Echo(Jaise Jose) Medicine |
| 08 | 08/07/2023 Saturday | | | | |
| 09 | 09/07/2023 Sunday | Dharangaon | Bhausaheb Sonawane 9561820859 | Makrand Mahajan 9765271188 | 2D Echo<br>All Department |
| 10 | 10/07/2023 Monday | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 11 | 11/07/2023 Tuesday | **Off** | **Off** | **Off** | **Off** |
| 12 | 12/07/2023 Wednesday | | | | |
| 13 | 13/07/2023 Thursday | | | | |
| 14 | 14/07/2023 Friday | | | | |
| 15 | 15/07/2023 Saturday | Nandura | Vinalkumar Mirge 9850301006 | Makrand Mahajan 9765271188 | 2D Echo(Jaise Jose) All Department |
| 16 | 16/07/2023 Sunday | **Off** | **Off** | **Off** | **Off** |
| 17 | 17/07/2023 Monday | | | | |
| 18 | 18/07/2023 Tuesday | | | | |
| 19 | 19/07/2023 Wednesday | | | | |
| 20 | 20/07/2023 Thursday | | | | |
| 21 | 21/07/2023 Friday | | | | |
| 22 | 22/07/2023 Saturday | | | | |
| 23 | 23/07/2023 Sunday | **Off** | **Off** | **Off** | **Off** |
| 24 | 24/07/2023 Monday | | | | |
| 25 | 25/07/2023 Tuesday | | | | |
| 26 | 26/07/2023 Wednesday | | | | |
| 27 | 27/07/2023 Thursday | | | | |
| 28 | 28/07/2023 Friday | | | | |
| 29 | 29/07/2023 Saturday | | | | |
| 30 | 30/07/2023 Sunday | **Off** | **Off** | **Off** | **Off** |
| 31 | 31/07/2023 Monday | | Dean Dr. Ulhas Patil Medical College & Hospital, Jalgaon Kh. | | |
| | | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

Dean
Dr. Ulhas Patil Medical College
& Hospital, Jalgaon Kh.

Godavari Foundation's

# DR. ULHAS PATIL MEDICAL COLLEGE & HOSPITAL,

**Recognized by Medical Council of India, Approved by Central Govt. of India, New Delhi,**
**Letter no. MCI-34(41)/2012-med./158127, dated 05/02/2013**
**Affiliated to Maharashtra University of Health Sciences, Nashik [College Code-1306]**
**Jalgaon-Bhusawal Road, Jalgaon Kh, Tal. & Dist. Jalgaon 425309**
**Tel. No. (0257)2366657, 2366678 Fax No. 0257-2366648**
**Email ID : dupmcj@yahoo.in Web Site : www.dupmc.ac.in**

